मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

follow us : /rajdandlive

RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २१४ ⁘ सातारा ⁘ शुक्रवार, दि. १२ एप्रिल २०२४ ⁘ पाने ६ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/- रूपये



नरेंद्र मोदी यांनी केलेले काम काँग्रेसला ५० वर्षात जमले नाही!

वृत्त पान ३ वर...

# महाराष्ट्रात नकली शिवसेना अन् राष्ट्रवादी, तर काँग्रेस अर्धी संपलेली

## तीन तिघाडा काम बिघाडा, हे कोणाचंही भलं करणार नाहीत; अमित शहांचा हल्लाबोल



**नांदेड : महाराष्ट्रात तीन पक्ष एकत्र येवून महायुतीला आव्हान देत आहेत. परंतु महाराष्ट्रात यातील नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी आणि अर्धी संपलेली काँग्रेस आहे. हे लोकांचे भलं करू शकत नाही. यांच्यावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही, असा हल्लाबोल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. ते नांदेडमध्ये आयोजित प्रचार सभेला संबोधित करत होते.**

अमित शहा पुढे बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरेंची शिवसेना व शरद पवारांची एनसीपी अर्धी झालेली आहे. यांनी मिळून काँग्रेसला देखील अर्ध करू टाकले आहे. दोन नकली अन् अन् एक अर्धवट झालेली काँग्रेस पार्टी महाराष्ट्राचे भलं करू शकत नाही. या तीन चाकी ॲटो रिक्षाला कोणतेही भवितव्य नाही. कोणतेही धोरण नाही.

हे निवडणूकीच्या नंतर आपपासांत वाद घालणार आहेत. तर दुसरीकडे मोदींच्या नेतृत्वात देशभक्तांची टोळी एनडीएमध्ये आहे. देशाच्या विकासासाठी एनडीए विचार करत असून त्या दृष्टीने विकास करत आहे.

काँग्रेसवाल्यांना वाटत आहे की, नांदेडचे हवामान बदलले आहे. त्यामुळे सभा होणार नाही. परंतु मी त्यांना सांगतो की, देशाचे हवामान बदलले आहे. फिर एक बार चारसो पार नक्कीच होणार आहे. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मत म्हणजे मोदींना मत आहे, असे म्हणत त्यांनी मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

अमित शहा म्हणाले की, काश्मीरमधील ३७० कलम हटले पाहिजे की नाही, तर देशातील प्रत्येकाला वाटते की, हे हटले पाहिजे, ते काम भाजपने करून दाखवले. पण काँग्रेस अध्यक्ष खरगे म्हणतात की, त्याचा महाराष्ट्र अन् राजस्थानमध्ये जाऊन का गाजावाजा केला जात आहे. काँग्रेसवाल्यांना काश्मीर भारतात वाटत नाही का?, असा सवाल देखील शहा यांनी करत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

मी शरद पवार यांना विचारु इच्छितो, एक गोष्ट सांगा, १० वर्षांपर्यत तुम्ही सोनिया, मनमोहन सरकारचे कर्ताधर्ता होते, तुम्ही १० वर्षात महाराष्ट्राला काय दिलं? नांदेडकरांनो हिशोब मागयाला हवा की नाही? त्यांनी हिशोब द्यायला हवा की नको? पण ते देणार नाहीत. पण मी हिशोब देवून जातो. त्यांनी १० वर्षात महाराष्ट्राला १ लाख ९१ हजार कोटी रुपये दिले होते. नरेंद्र मोदी सरकारने १० वर्षात ७ लाख १५ कोटी रुपये दिले आहेत.

त्याऐवजी इन्फ्रास्ट्रकच्या विकासासाठी ३ लाख ९0 हजार कोटी रुपये दिले. ७५ हजार कोटी रुपये नॅशनल हायवेसाठी, २ लाख १0 हजार कोटी रुपये रेल्वेसाठी, ४ हजार कोटी रुपये विमानतळासाठी आणि १ लाख कोटी रुपये स्पेशल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी प्रोजक्टसाठी देण्याचं काम नरेंद्र मोदींनी केलं आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस पक्षाची मंडळी महाराष्ट्राचा विकास करु शकत नाही. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचा विकास करु शकतात, असा दावा अमित शहा यांनी केला.

तत्पूर्वी अमित शहा यांनी खजुराहो लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या कटनीच्या बार्ही येथे निवडणूक रॅलीला संबोधित केले. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींना पराभूत करण्यासाठी जातीवादी आणि कुटुंबावर आधारित पक्ष एकत्र आले आहेत. ते म्हणाले की, काँग्रेसने ७0 वर्षे जातीवाद, घराणेशाही आणि भ्रष्टाचाराच्या आधारे राज्य केले. मोदींनी देशातून जातीवाद, घराणेशाही आणि भ्रष्टाचार संपवला. शहा यांनी विरोधी पक्षांच्या घोटाळ्यांचा समाचार घेतला. ज्याने भ्रष्टाचार केला, ज्याने चोरी केली त्याला तुरुंगात जावे लागेल, असे ते म्हणाले.


तत्पूर्वी, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी मांडला येथे सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरिबांना गरिबीतून बाहेर काढण्याचे काम केले आहे. त्यांना स्वयंपाकासाठी गॅस सिलिंडर आणि राहण्यासाठी घरे देण्यात आले आहेत. भाजपचे लोकसभेचे उमेदवार फग्गनसिंग कुलस्ते यांच्या बाजूने गुरुवारी झालेल्या मेळाव्याला संबोधित करताना शहा म्हणाले की, आम्ही देशाची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आणली आहे. मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, ते तिसऱ्या क्रमांकावर पोहोचतील.

# मोदी म्हणजे वसुलीखोर, गल्लीचा दादा देशाचा पंतप्रधान बनलाय

## प्रकाश आंबेडकरांची जहरी टीका

**यवतमाळ :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाचे वाटोळे केले आहे. इलेक्ट्रॉल बॉण्ड हा देशातील सर्वात मोठा फ्रॉड आहे. देशाचा पंतप्रधान गल्लीचा दादा बनला आहे . आपली चौकशी होऊ नये म्हणून कंपनी बॉण्ड दिले आहेत. याची चर्चा देशाच्या बाहेर जात आहे असा वसुलीखोर पंतप्रधान आहे, अशी जहरी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे चंद्रपूर-आर्णी लोकसभा मतदार संघाचे उमेदवार राजेश बेले यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, मोदींनी देशाचे वाटोळे केले आहे. एका बाजूला चीन आणि दुसऱ्या बाजूला पाकिस्तान छातीवर बसत



आहे. दररोज आपले जवान शहीद होत आहे. ५६ इंचाची छाती ही १४ इंचाची झाली आहे. ४00 येईल असे म्हणतात पण १0४ ही येणार नाही. ही एकतर्फी लढाई नाही. जनता सरकारच्या विरोधात आहे. उद्या कोण पंतप्रधान होईल ते नंतर पाहू पण मोदीला खेचा.

काँग्रेस ही काँग्रेस राहिली नाही. काँग्रेस मिंधी झाली. भाजपला अंगावर घेतले पाहिजे ते दिसत नाही. काँग्रेसने जाहीर केलेले भंडाऱ्याचे उमेदवार नाना पटोले यांनी माघार घेतली. सेनेचा प्रमुख लढत नाही तर सैन्य काय लढणार? काँग्रेस अनेक ठिकाणी कमजोर उमेदवार दिला आहे. काँग्रेसने पहिले आपले अस्तित्व ओळखावे,भाजपचे एजंट ओळखावे. भाजपचे लोक म्हणतात आमच्या सारखे भ्रष्ट सरकार नाही. प्रमुख विरोध पक्ष काँग्रेस लढायला तयार नाही . स्वत:चे स्वतंत्र अबाधीत ठेवायचे असेल तर भाजपचे उमेदवार पाडा नाहीतर हुकमशाही आल्याशिवाय राहणार नाही. व्यापाऱ्यांनी पैसे भाजपला द्या पण मत देऊ नका, कारण तुमच्या घरी ईडी, सीबीआयआल्याशिवाय राहणार नाही, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

आगामी २0२४ ते २0२९ या काळात भारताच्या अनेक भागात मणिपूर घडल्याशिवाय राहणार नाही १0 वर्षे झाली सत्तेत बसले अजूनही इतिहासात रेंगाळत बसले आहे. सनातनी वाद्यांनी मोदींना विचारले का? पुरावे आहे का की फक्त मोदी करणार आहे. भाजपचे नाव मिटले आहे. सरकार मोदींचे, उमेदवार कुणाचे मोदींचे, योजना मोदींच्या झेंडा भगवा झाला.

## भाजपा उमेदवारांची ११ वी यादी जाहीर!

**मुंबई :** देशात लोकसभा निवडणूक एकूण सात टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान येत्या १९ एप्रिल रोजी होणार आहे. त्या अनुषंगाने उमेदवारांची नावे घोषित करण्यात आली आहेत. निवडणुकीला ८ दिवस बाकी असून भाजपा उमेदवारांची ११ वी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये उत्तर प्रदेशातील एकाच उमेदवाराची घोषणा करण्यात आली असून अद्यापही महाराष्ट्रातील काही जागांचा सस्पेन्स कायम आहे.

भारतीय जनता पक्षाच्या ११ व्या यादीतही महाराष्ट्रातील सातारा आणि रत्नागिरी या लोकसभा मतदार संघाचा समावेश नाही. त्यामुळे अजूनही या जागांचा सस्पेन्स कायम आहे.

# विजय वडेट्टीवार यांचा लवकरच भाजपमध्ये प्रवेश होणार

## धर्मरावबाबा आत्राम यांच्या दाव्याने खळबळ

**गडचिरोली :** लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपाचा सामना रंगला आहे. यात राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी राज्याचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असा दावा केल्याने ऐन निवडणुकीत खळबळ उडाली आहे. यावर वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर देत दावा तथ्यहीन असल्याचे सांगितले.



गडचिरोली-चिमूर लोकसभेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संपूर्ण शक्ती पणाला लावली आहे. काँग्रेसकडून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार तर महायुती कडून मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे चित्र आहे. दरम्यान, बुधवारी मंत्री आत्राम यांनी विजय वडेट्टीवार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा केल्याने पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. वडेट्टीवारांच्या प्रवेशासंदर्भात झालेल्या बैठकीत मी स्वत: उपस्थित होतो, असे आत्राम यांनी स्पष्ट केल्याने राजकीय वर्तुळात चर्चा उधाण आले आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, महायुतीला पराभव समोर दिसत असल्याने त्यांचे नेते काहीही दावे करत सुटले आहेत, असे विधान विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे.

# तृतीयपंथांच्या गैरवागणुकीवर नवी नियमावली जाहीर

**पुणे :** अनेक ठिकाणी तृतीयपंथी नागरिकांकडून जबरदस्तीने पैशांची मागणी करतात. रेल्वे, रस्ते, लग्न समारंभ, विविध सण, धार्मिक कार्यक्रम, वाढदिवस, बारसे, नामकरण विधी अशा बऱ्याच कार्यक्रमात जाऊन तृतीयपंथीयांकडून पैशांची मागणी केली जाते. मात्र आता अशा वागणुकीमुळे पुण्यातील वाहतूक शाखा,पोलिस ठाण्यातील कर्मचारी आणि बीट मार्शलकडून अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

पुणे शहरातील चौकांमध्ये सिग्नलला आणि धार्मिक कार्यक्रमात घरी जाऊन नागरिकांकडे जबरदस्तीने पैशांची मागणी करणाऱ्या तृतीयपंथीयांवर कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश पोलिस आयुक्त यांनी दिले आहेत. निमंत्रण नसताना बऱ्याचदा पैशांसाठी जबरदस्ती केली जाते. शहरातील मुख्य चौकांमध्ये, बाजारपेठांमध्ये तृतीयपंथीयांकडून वाहनचालक आणि नागरिकांना पैशांसाठी त्रास देत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून नियमावली तयार करण्यात आली आहे.

**हे आहेत नियम :** तृतीयपंथीयांना नागरिकांच्या घरी आणि दुकानांमध्ये जाऊन जबरदस्तीने पैसे **(पान ३ वर)**

## महिलेवर अत्याचार करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** महिलेवर अत्याचारासह १३ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एका विरोधात कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २0 मे २0२१ ते २४ सप्टेंबर २0२३ दरम्यान कराड तालुक्यात राहणाऱ्या एका महिलेस भास्कर उर्फ बिभीषण विष्णु शिंदे रा. मनपाडळे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर याने शेअर मार्केटच्या ट्रेडिंग ची माहिती व चांगला परतावा देण्याच्या बहाण्याने विश्वास संपादन करून संबंधित महिलेकडून **(पान ३ वर)**

# भाजपकडून लोकशाही संपविण्याचा घाट - विक्रमसिंह पाटणकर

## नवी मुंबईत शरद पवार गटाच्या कार्यालयाचे उद्‌घाटन व पाटण तालुका मित्रमंडळांचा संवाद मेळावा

**राजदंड / नवी मुंबई / पाटण**

भाजप लोकशाही, संविधान संपवण्यासाठी प्रयत्न करत आहे, देशातील लोकशाही संपली तर सर्व सामान्यांच्या हक्कासाठी कोणीही पुढे येऊ शकणार नाही, अगदी गावातील सरपंच कोण असावे याची यादीही दिल्लीतून येईल. सर्व सामान्य जनता नेत्यांच्या हातातील बाहुले बनून जाईल आपले नेते शरद पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहून मोदी-शहाला त्यांची जागा दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे अशी टीका राज्याचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी सरकारवर केली .

नवी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन व संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी ते बोलत





होते, यावेळी माजी मंत्री आ. शशिकांत शिंदे, सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, शरद पवार गटाचे पाटण तालुकाध्यक्ष राजाभाऊ शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती .

या संवाद मेळाव्यात बोलताना माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, सरकारी यंत्रणांचा आणि आपल्या अधिकारांचा गैरवापर करून या भाजपा सरकारनं देशात हुकुमशाही आणण्याच्या कट रचला आहे. इडीचा धाक दाखवून हळूहळू देशातील सर्व विरोधी पक्ष फोडून त्यांचे नेते भाजपात भरती करुन देशात सक्षम विरोधी पक्षच न ठेवता एकछत्री अंमल प्रस्थापित करायचा डाव या सरकारचा असल्याची टिका त्यांनी यावेळी केली. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत जर आपण यांना पुन्हां निवडून दिले तर भविष्यात कधीही भारतात निवडणूका होणार नाहीत आणि देशातील लोकशाही संपुष्टात येईल अशी भिती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

मेळाव्यात बोलताना आ.शशिकांत शिंदे यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली. भाजपा सरकारने गेल्या १0 वर्षात सर्वसामान्य जनतेची फक्त लूटच केली असून शेतकऱ्यांपासून अगदी विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांचीच या सरकारने फसवणूक केली असल्याचे त्यांनी सांगितले. घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेल यांच्या किंमती वाढतच चालल्या आहेत. भारत देशातील नागरिक चार घास सुध्दा सुखाने खाऊ शकत नाही कारण त्याच्या जेवणाच्या ताटावरही या सरकारनं **(पान ३ वर)**

# राज्यात सर्वाधिक मतदार पुण्यात; चार जिल्ह्यांमध्ये महिला मतदार सर्वाधिक

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघातील सुमारे सव्वा नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येच्या बाबतीत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर असून तेथे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात जास्त मतदार आहेत. नंदुरबार, गोंदिया, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग अशा चार जिल्हयांमध्ये पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे.

■ **पुण्यात ८२ लाखांहून अधिक मतदार**

पुण्याची एकूण मतदार संख्या ८२ लाख ८२ हजार ३६३ आहे. तर मुंबई उपनगरची एकूण मतदार संख्या ७३ लाख ५६ हजार ५९६ इतकी आहे. ठाण्याची एकूण मतदार संख्या ६५ लाख ७९ हजार ५८८, नाशिक जिल्ह्यातील एकूण मतदार संख्या ४८ लाख 0८ हजार ४९९ इतकी आहे. तर नागपूरची एकूण मतदार संख्या ४२ लाख ७२ हजार ३६६ इतकी आहे.

■ **रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्गात महिला मतदारांची संख्या अधिक**



चार जिल्ह्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदार सर्वाधिक आहेत. रत्नागिरीची एकूण मतदार संख्या १३ लाख 0३ हजार ९३९असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३१ हजार 0१२ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ७२ हजार ९१६ इतकी आहे. नंदुरबारची एकूण मतदार संख्या १२ लाख ७६ हजार ९४१ असून यामध्ये १२ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३७ हजार ६0९ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ३९ हजार ३२0 इतकी आहे. गोदिंया जिल्हयातही महिला मतदारांची संख्या जास्त आहे. गोंदियाची एकूण मतदार संख्या १0 लाख ९२ हजार ५४६असून यामध्ये १0 तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५ लाख ४१ हजार २७२ आहे तर महिला मतदारांची संख्या ५ लाख ५१ हजार २६४ इतकी आहे. सिंधुदुर्गाची एकूण मतदार संख्या ६ लाख ६२ हजार ७४५असून यामध्ये १ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३ लाख ३0 हजार ७१९ आहे तर महिला मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार 0२५ इतकी आहे.

राज्यात १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २0 मे अशा पाच टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा तयारीला लागली आहे. राज्यात ८ एप्रिल २0२४ पर्यंत एकूण ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८0६ मतदारांची नोंद आहे. यामध्ये ४ कोटी ८0 लाख ८१ हजार ६३८ पुरुष मतदार तर ४ कोटी ४४ लाख 0४ हजार ५५१ महिला मतदार आणि ५ हजार ६१७ तृतीयपंथी मतदार आहेत.

■ **५ जिल्ह्यात ३0 लाखांहून अधिक मतदार**

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये ३0 लाखांहून अधिक मतदार आहेत. अहमदनगरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार २५२ आहेत. सोलापूरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार १४१ आहेत. जळगावमध्ये एकूण मतदार ३५ लाख २२ हजार २८९ आहेत. कोल्हापूरमध्ये एकूण मतदार ३१ लाख ७२ हजार ७९७ आहेत. छत्रपती संभाजीनगर मध्ये एकूण मतदार ३0 लाख ४८ हजार ४४५ आहेत.

बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १0 जिल्ह्यांमध्ये २0 लाखांहून अधिक मतदार आहेत.

# जिल्ह्यात दोन विविध घटनांमध्ये ६५ लाख रूपयांची रोकड जप्त

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून भरारी पथकाद्वारे आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पोलीस पथक आणि भरारी पथकांद्वारे दोन विविध घटनांमध्ये सुमारे ६५ लाखांची रोकड आणि एक वाहन ताब्यात घेण्यात आले आहे.

आचारसंहिता काळात ५0 हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जवळ बाळगता येत नाही. भरारी पथकांतर्फे विविध ठिकाणी जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी भोसरी एममआयडीसी पोलीस स्टेशन जवळील सी सर्कल जवळ ८ एप्रिल रोजी मध्यरात्री फॅन्सी नंबर प्लेट असलेली आणि संशयास्पदरितीने फिरणारी काळ्या रंगाची फॉरच्यूनर गाडी आढळून आली. पोलीसांनी अधिक तपास करून गाडीतून १३ लाख ९0 हजाराच्या ५00 रुपयांच्या नोटा आणि ३0 लाख रुपये किंमतीचे वाहनही पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त केले आहे.

तर, दुसऱ्या एका घटनेत १0 एप्रिल रोजी दुपारी शिरुर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना शिरुर नगर परिषद क्षेत्रातील कमान पूलाजवळ एका खाजगी वाहनातून ५१ लाख १६ हजाराची रक्कम नेली जात असल्याचे पाहणीत आढळून आले. याबाबत माहिती मिळताच भरारी पथकातील कर्मचाऱ्यांनी प्राप्तिकर विभागाला याबाबत माहिती दिली. ही रक्कम कोषागारात ठेवण्यात आली असून प्राप्तिकर विभागाच्या चौकशीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी दिली आहे.

# धोक्याची घंटा

आपल्या जीवन मरणाच्या प्रश्नाऐवजी इतर प्रश्न आणि टीका-टिप्पणीला कसे महत्त्व आले आहे, हे या निवडणुकीत दिसले; परंतु ज्यामुळे जगणेच अवघड होणार आहे, अशा हवामान बदलाकडे आणि त्याच्या परिणामाकडे कोणताही राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते दुर्लक्ष करीत आहेत. हिवाळ्यात न पडलेली थंडी, कमी पाऊस, अंग भाजून काढणारे ऊन यासोबत आता जगण्याची सवय करताना हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांचा विचार करून त्यावर काही धोरणात्मक निर्णय होणार आहेत, की नाहीत हा खरा प्रश्न आहे. संपूर्ण हिमालय पर्वत परिसरात एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे परिवर्तन होत आहे.

बर्फाची रेषा कायमस्वरुपी शंभर मीटर मागे सरकली आहे. शंभर मीटर बर्फरेषा मागे सरकली, तर काय फरक पडतो, असे वाटणारा वर्ग असेल; परंतु त्याचे परिणाम काय होतील, याच्या अज्ञानापोटी त्याची तशी मानसिकता झालेली असेल. हिवाळ्यात तापमानात एक अंश वाढ झाल्यामुळे हिमखंड तीन किलोमीटरने कमी झाले आहेत. त्यामुळे बर्फवृष्टीचा हंगाम दीड महिन्याने पुढे सरकला आहे. हिमालयीन भागात जी बर्फवृष्टी डिसेंबर-जानेवारी महिन्यात व्हायची, ती या वर्षी फेब्रुवारीच्या मध्यापासून सुरू झाली आणि मार्चपर्यंत सुरू राहिली. उत्तराखंडमधील 'वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिऑलॉजी'च्या शास्त्रज्ञांनी १९०१ ते २०१८ पर्यंतच्या हवामान संशोधन युनिटच्या डेटाचे विश्लेषण केले आहे. तापमान असेच वाढत राहिल्यास हिमालयातील हिमवर्षाव हंगाम आठ ते दहा वर्षांत पूर्णपणे बदलू शकतो किंवा हिमवृष्टीचे प्रमाण कमी होईल, असा निष्कर्ष त्यातून निघाला आहे. डिसेंबर-जानेवारीतील बर्फवृष्टी कमी तापमानामुळे गोठून जायची; पण या वेळी पडणारा बर्फ जास्त तापमानामुळे वितळला आणि वाहून गेला. या वेळी हिमालयाची बर्फाची शिखरे लवकरच रिकामी होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या दशकात हिवाळ्याच्या तापमानात वाढ झाली आहे, तर उन्हाळ्यात तापमान स्थिर राहिले आहे. त्यामुळे हिमालयात बराच काळ उष्णता कायम राहते. ही बदलती परिस्थिती हिमालयातील जीवजंतू आणि वनस्पतींसाठी धोक्याची घंटा आहे. हिमालयाच्या चार ते पाच हजार मीटर उंचीवर कायम बर्फाची रेषा आहे. त्याच्या खाली तीन हजार मीटरपर्यंत झाडे नाहीत. ही रेषा मागे पडल्यामुळे जिथे पूर्वी कमी तापमानात बर्फवृष्टी होत होती, तिथे आता पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे हिमालयाच्या अनेक किलोमीटर भागातून बर्फ गायब होऊ लागला आहे. बदलत्या हवामान चक्राचा सर्वात मोठा परिणाम देशाच्या उत्तर-पूर्व भागात जाणवला आहे. 'रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट डेटा' दर्शवितो, की १९७१ ते २०२१ दरम्यान अरुणाचल प्रदेशातील बहुतेक हिमखंड प्रतिवर्षी सरासरी नऊ मीटर वेगाने २१० मीटर मागे सरकले आहेत, तर लडाखमध्ये हा वेग वर्षाला चार मीटर इतका आहे. काश्मीरमधील हिमनद्या वितळण्याचा वेगही जवळपास सारखाच राहिला आहे. आज जिथे गंगोत्री मंदिर आहे, तिथे पूर्वी हिमखंड होता; पण जसजसे तापमान वाढले आणि ऋतूचक्र बदलले, तसतसे हिमखंड आकुंचन पावू लागले. १८१७ पासून ते आतापर्यंत अठरा किलोमीटरहून अधिक मागे सरकले आहे. १९७१ पासून, हिमखंडांच्या मागे जाण्याचा दर दरवर्षी बावीस मीटर आहे. काही वर्षांपूर्वी गोमुखाच्या प्रचंड हिमखंडाचा काही भाग तुटून भागीरथीवर म्हणजेच गंगा नदीच्या उगमस्थानावर पडला होता. अशा प्रकारे हिमालयातील हिमखंड तुटणे हे निसर्गाचे अशुभ लक्षण मानले जाते. गोमुखापासून अठरा किलोमीटर अंतरावर असलेल्या गंगोत्री, भागीरथीच्या जोरदार प्रवाहात हे तुकडे तरंगताना दिसले. गंगोत्री नॅशनल पार्कच्या वन अधिकाऱ्यांनी या हिमखंडाच्या तुकड्यांचे फोटो घेऊन हिमखंड तुटल्याची पुष्टी केली होती. तेव्हाही हिमनदीचे शास्त्रज्ञ या घटनेच्या पार्श्वभूमीवर कमी बर्फवृष्टी झाल्याचे सांगत होते.

या कमी बर्फवृष्टीचे कारण पृथ्वीचे वाढते तापमान असल्याचे सांगितले जात आहे. कालांतराने पृथ्वीवरील तापमान असेच वाढत राहिल्यास आणि धूप होऊन हिमखंड तुटत राहिले, तर त्याचा परिणाम समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि नद्यांच्या अस्तित्वावर होणार हे निश्चित. हिमखंड तुटण्याची प्रक्रिया सुरू राहिल्यास समुद्राची पातळी वाढेल. त्यामुळे अनेक लहान बेटे आणि किनारपट्टीवरील शहरे पाण्याखाली जाऊ लागतील. आतापर्यंत हिमनग वितळल्याची माहिती येत होती; मात्र कोणताही हिमखंड तुटण्याची घटना अपवादानेच घडते. काही काळापूर्वी ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राच्या पातळीत वाढ झाल्याने प्रशांत महासागरातील पाच बेटे पाण्याखाली गेल्याचे समोर आले होते. सुदैवाने, या बेटांवर मानवी वस्ती नव्हती. त्यामुळे जगाला विस्थापन आणि निर्वासितांच्या समस्यांना तोंड द्यावे लागले नाही. जगाच्या नकाशावरून गायब झालेली ही बेटे म्हणजे केल, रेपिटा, कलाटिना, झोलिम आणि रेहाना. गेल्या दोन दशकांपासून या भागातील समुद्राची पातळी दरवर्षी दहा मिलीलीटरने वाढत आहे. सध्या, भारतीय शास्त्रज्ञ गोमुखातून गंगेच्या अवतरणासाठी पाण्याचा स्त्रोत असलेल्या हिमालयावरील हिमखंड तुटणे ही एक सामान्य घटना मानतात. कमी बर्फवृष्टी आणि जास्त उष्णतेमुळे हिमखंडांमध्ये भेगा निर्माण झाल्या होत्या. पावसाचे पाणी तुंबल्याने हिमखंड तुटू लागले. सध्या गोमुख हिमखंडाच्या डाव्या बाजूचा भाग तुटला आहे. उत्तराखंडच्या जंगलात दरवर्षी लागणाऱ्या आगीमुळे हिमनगही कमकुवत झाले आहेत. ज्वाला आणि धुरामुळे बर्फाळ खडकांवरील कच्चा बर्फ वेगाने वितळू लागला. त्यामुळे तडे भरता आले नाहीत. आता धुरातून तयार होणारा कार्बन खडकांवर असाच जमा होत राहिला तर भविष्यात नवीन बर्फ तयार होणे कठीण होईल, अशी भीती शास्त्रज्ञ व्यक्त करत आहेत. हिमखंड तुटणे ही नवीन गोष्ट आहे; परंतु त्यांचे वितळणे नवीन नाही. शतकानुशतके, हिमखंड नैसर्गिकरित्या वितळत आहेत आणि नद्यांमध्ये सतत पाण्याचे प्रवाह तयार करत आहेत; परंतु जागतिकीकरणानंतर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या शोषणावर आधारित औद्योगिक विकासातून उत्सर्जित होणाऱ्या कार्बनमुळे त्यांच्या वितळण्याची तीव्रता वाढली आहे. एक शतकापूर्वीही हिमखंड वितळत असत; परंतु बर्फ पडल्यानंतर त्यांचे क्षेत्रफळ सतत वाढत गेले. त्यामुळे गंगा, यमुना या नद्यांचा प्रवाह चालू राहिला. १९५० पासून त्यांची व्याप्ती वर्षाला तीन ते चार मीटरने कमी होऊ लागली. १९९० नंतर हा वेग अधिक वाढला. तेव्हापासून गंगोत्रीचे हिमनग दरवर्षी पाच ते वीस मीटर वेगाने वितळत आहेत. उत्तराखंडच्या इतर पाच हिमशैलींमध्ये-सतोपंथ, मिलम, नीती, नंदादेवी आणि चोरमध्ये कमी-अधिक परिस्थिती अशीच आहे.

भारतीय हिमालयात एकूण ९,९७५ हिमखंड आहेत. त्यापैकी नऊशे उत्तराखंडमध्ये येतात. देशातील चाळीस टक्के लोकसंख्येला पिण्याचे पाणी, सिंचन आणि उपजीविकेची अनेक साधने पुरवणाऱ्या या हिमनद्यांमधून बहुतांश नद्या उगम पावतात; पण हिमनग वितळण्याची आणि तुटण्याची हीच प्रवृत्ती सुरू राहिली, तर या नद्यांमधून राहणाऱ्या पन्नास कोटी लोकसंख्येला रोजगार आणि उपजीविकेची पर्यायी साधने उपलब्ध करून देण्याचा देशाकडे कोणताही मार्ग नाही. वाढत्या तापमानाला आळा घालणे सोपे नाही; परंतु औद्योगिक उपक्रमांना विराम देऊन ते काही प्रमाणात थांबवले जाऊ शकते. पर्यटनामुळे हिमालयीन प्रदेशात मानवी क्रियाकलाप वाढत आहेत. त्यांना आळा घालण्याची गरज आहे. याशिवाय आपल्या ज्ञान परंपरेतील हिमनगांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या उपाययोजनांना महत्त्व द्यावे लागेल.

सिक्कीममधील लाहोनक ग्लेशियर सरोवर फुटण्याची घटना जुनी नाही. त्यात १८० लोकांचा मृत्यू आणि पाच हजार कोटींचे नुकसान झाल्याची बातमी आली होती. केदारनाथमधील चौराबारी हिमनदी तलाव फुटल्याने हजारो लोकांचा महापुरात मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये उत्तराखंडच्या नीती व्हॅलीमध्ये हिमनदी तलाव फुटल्याने २०० लोकांच्या मृत्यूसह १,५०० कोटी रुपयांचे नुकसान झाले. हिमालयीन प्रदेशात येणाऱ्या राज्यांमध्ये १८८ धोकादायक हिमनदी तलाव तयार झाले आहेत. मोठा भूकंप झाल्यास लाखो लोकांच्या जीवनावर घातक परिणाम होऊ शकतो. ईशान्येकडील सरोवरे सर्वाधिक धोक्याचे कारण असले, तरी काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममध्येही धोका कायम आहे. केंद्रीय गृहमंत्रालयांतर्गत कार्यरत आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि हिमालय अभ्यास तज्ज्ञांच्या पथकाने केलेल्या एक वर्षाच्या अभ्यासानंतर जे निष्कर्ष समोर आले आहेत, ते चिंताजनक आहेत.

या संवेदनशील भागात सात रिश्टर स्केलचा भूकंप झाल्यास हे तलाव पाण्याच्या बॉम्बप्रमाणे फुटू शकतात, अशी भीती पर्यावरणतज्ज्ञ व्यक्त करत आहेत. त्यामुळे सहा राज्यांतील सुमारे तीन कोटी लोकसंख्येला फटका बसू शकतो. जागतिक तापमानवाढीच्या संकटामुळे हिमालयीन प्रदेशांमध्ये २८ हजारांहून अधिक सरोवरे तयार झाली आहेत. त्यातील १८८ अधिक धोकादायक ठरू शकतात. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळण्याचे प्रमाण १५ टक्क्यांनी वाढले असल्याची चिंता शास्त्रज्ञ व्यक्त करत आहेत. या भागात स्वयंचलित हवामान निरीक्षण केंद्रे तयार करण्यात आली आहेत. या धोकादायक तलावांचे पाणी आधुनिक पद्धतीने कसे सोडता येईल, यावर विचारमंथन केले जात आहे. एकीकडे तलावातील पाणी उपसण्याचे मार्ग शोधले जात आहेत, तर दुसरीकडे ड्रिलिंगद्वारे पाणी नियंत्रित करण्याचाही विचार केला जात आहे.

## सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक परशुराम लोखंडे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन उत्साहात



**नारायणगाव :** पारगाव (शिंगवे) येथील रहिवासी असलेले तसेच मुंबई क्राइम ब्रँचचे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी परशुराम बाबुराव लोखंडे यांच्या प्रेमलीला भाग १ ते ३ तसेच अनुबंध या काव्यसंग्रहांचा प्रकाशन सोहळा कविवर्य अशोक बागवे यांचे शुभहस्ते नूकताच पार पडला.

यावेळी कवि सतिश सोळाळूंकर यांनी कवी परशुराम लोखंडे यांचे कौतुक केले, यावेळी एडव्होकेट आर. बी. मातकर यांच्या मातीतील हिरे तसेच सख्खी शेजारीण या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. शारदा प्रकाशनचे प्रकाशक संतोष राणे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ठ नियोजन केले व उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक लोखंडे यांचे कुटुंबीय व मान्यवर उपस्थित होते

## नाल्यातील कचरा, झाडे पावसाळ्या पुर्वी काढण्याची मागणी

**बाणेर,बालेवाडी :** बाणेर पॅन कार्ड क्लब रोडवरील नाल्यामध्ये कचरा,गवत झाडे वाढमुळे या नाल्याची दयनिय अवस्था झाली मोठ

मोठ्या सोसायटीचे सांडपाणी या नाल्यामध्ये सोडल्या जाते तसेच पावसाळ्यातील रोडचे पाणी या नाल्यामध्ये जाते नाल्या जवळील घरे ,दूकानदार यात कचरा टाकतात यावर कोणाचेही बंधन नसल्यामुळे आणि कोणाचेही लक्ष नसल्या कारणाने या नाल्याची दयनिय अवस्था झालेली दिसते

पावसाळा जवळ येत आहे नाले सफाई वेळेवर न झाल्यास जागो जागी पाणी थांबण्याचा पूढे प्रकार घडू शकतोएक वेळेस पावसाळ्या पूर्वी साफ सफाई केली जाते मग वर्षभर कोणीही यावर ढूंकूनही पाहत नाही अनेक ठिकाणी या नाल्यात कचरा टाकल्या जात आहे तर एका वाशिंग सेन्टरने नाल्यावर पाईप आणि मूरूमाचा भराव टाकून स्मार्ट सिटीविभागाने केलेल्या नाल्याच्या कामावर नाल्याचा मार्गच बंद करण्याचा प्रकार केला आहेपावसाळ्यात जास्त



पाऊस झाल्यास रोडवरिल येणारे पाण्याला अडथळा होऊ शकतोया नाल्याचे योग्य नियोजन होत नसल्या कारणाने गवत,झाडांची वाढ यात झाली तर यात भर पडते ती जवळील घरे,दूकानदार यात कचरा आणून टाकतात सोसायटी मधून येणारे पाणी गवत ,झाडे आणि घाणीयूक्त कचरा मुळे या पाण्याला वाहण्यासाठी मार्गच राहत नाही हे पाणी जागोजागीच साचत असल्यामुळे घाणीच्या साम्राज्यात वाढ होत आहे पावसाळ्या पूर्वि या नाल्याची साफसफाई होणे गरजेचे आहे या नाल्याची साफसफाई वर्षातून तीन वेळेस होणे गरजेचे आहे मोठ मोठाल्या सोसायटीचे सांडपाणी आणि

काही कंपनीच्या कार्यालयाचे पाणी या नाल्यात सोडल्या जाते कचरा आणि घाणीचे साम्राज्यमूळे नाल्याची फार दयनिय अवस्था झाली आहेअनेक वेळेस महानगरपालीकेला येथिल सोसायट्यांनी तक्रारी करूनही यावर उपाय योजना केली जात नाही स्मार्ट सिटी म्हणून गणला जाणारा हा विभाग याची फार दयनिय स्थिती झालेली आहेया नाल्यात मोठमोठाले झाडे वाढली आहे तर जागो जागी गवत सुध्दा वाढले आहे तरी तातडीने या नाल्याची साफसफाई करण्याची मागणी होत आहे तर या नाल्यात कचरा ,घाण टाकणारे दूकानदार आणि घरावर कारवाईची मागणी केली जात आहे

## विहिरीत पडलेल्या नागाला सर्पमित्रांनी दिले जीवदान

### इंडियन कोब्रा नाग महिनाभर होता विहिरीत



**नारायणगाव :** नारायणगाव :- - ओझर रस्त्याजवळील शेळके वस्ती येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश शेळके, मंगेश शेळके तसेच राजेंद्र शेळके, प्राध्यापक योगेश शेळके यांच्या सामायिक विहिरीमध्ये गेली महिनाभरापासून अडकलेला इंडियन कोब्रा जातीचा नाग सर्पमैत्रीण नागेश्वरी केदार, सर्पमित्र यश चव्हाण व रेस्कयू टीम चे सदस्य किरण वाजगे यांच्या टीमने सुखरूप बाहेर काढला. व या नागाला निसर्गाच्या सानिध्यात सोडून दिले.

हा नाग सुमारे ३५ ते ४० फूट खाली विहिरीत कपारीवर बसला होता. त्याला बाहेर काढण्यासाठी दोराच्या सहाय्याने टोमॅटोचे क्रेट खाली सोडण्यात आले व अनेक दिवस दमलेल्या अवस्थेत असलेला हा नाग अलगदपणे त्या क्रेटमध्ये विसावला व लागलीच त्याला वर काढण्यात आले. विहिरीच्या काठावर नागाला काढल्यानंतर सर्प मैत्रीण नागेश्वरी केदार व यश चव्हाण यांनी त्याला शिताफिने पकडले व निसर्गाच्या सानिध्यात सोडले.

## राजगुरूनगर येथील भीमानदीचे पात्र जलपर्णीने व्यापले

**राजगुरूनगर (वा.) :** राजगुरूनगर येथील भीमानदीचे पात्र जलपर्णीने व्यापल्याने अक्षरशः नदीपात्रातील पाण्याचा ठाव ठिकाणा दृष्टीस पडत नाही. पात्रातील जलपर्णी मुळासकट काढण्याचा प्रश्न नगरपरिषद प्रशासन कधी मार्गी लावणार आणि पाण्यात असणाऱ्या जिवांना वाचविण्याचे धाडस हे प्रशासन कधी दाखवणार हाही महत्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भीमा नदीपात्रातील जलपर्णी काढण्याचा अनेकवेळा केलेला तात्पुरता प्रयत्न कधीच सफल झाला नाही व नागरिकांचे टॅक्स च्या रूपाने गोळा केलेले लाखो रुपये पाण्यात गेले. सद्य:स्थितीत भीमा नदी पात्रात वाढत चाललेल्या या जलपर्णीने शहरात गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. केदारेश्वर येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा असून येथून राजगुरूनगर शहराला पाणीपुरवठा होतो. बंधाऱ्याचे खालील नदीपात्रात पूर्णपणे जलपर्णी वाढली आहे शहरातील सांडपाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने या पाण्यावर जलपर्णी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विशेषता कपडे धुण्यासाठी पाण्यात पावडर, सोडा, साबण वापरला जात असल्याने हेच खाद्य जलपर्णीचे आयुष्य वाढवण्यास जबाबदार असल्याने यावर ती वाढत असते.

केदारेश्वर बंधाऱ्यापासून ते होलेवाडी बंधाऱ्यापर्यंतच्या नदीपात्र जलपर्णीने व्यापल्याने पाणीच दिसत नाही. त्यामुळे नदीपात्रातील जलपर्णीचे समूळ उच्चाटन होणे ही काळाची गरज असून त्यावर प्रशासन काय निर्णय घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

## 'वंचित'च्या उमेदवाराची तारीख ठरली

## निंबाळकरांची ठरणार; सोलापूर, माढासाठी शुक्रवारपासून अर्ज स्वीकारणार

**सोलापूर :** वंचित बहुजन आघाडीच्या सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारीख निश्चित केली आहे. माढ्याचे उमेदवार रमेश बारसकर शुक्रवार, १२ एप्रिल रोजी तर लापूरचे उमेदवार राहूल गायकवाड सोमवार, १५ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. माढ्याचे भाजपचे उमेदवाररणजितसिंह निंबाळकरयांची अर्ज भरण्याची तयारी अद्याप निश्चित झालेली नाही, असे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी सांगितले.-उत्तएठढखडएचएछढ-वी

लूसोलापूर आणि माढा लोकसभा



मतदारसंघासाठी शुक्रवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करायचे आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्याची सोय करण्यात आली आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे १८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते १६ एप्रिल रोजी अर्ज दाखल करणार आहेत. या दोन्ही उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करून अर्ज दाखल करण्याचे नियोजन सुरू केले आहे. एमआयएमचा सोलापूरचा उमेदवार अद्याप निश्चित झालेला नाही.

## उमेदवाराच्या नावाची घोषणा ही तिन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते मिळून करणार

**नाशिक :** कमळाच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याचा प्रस्तावच नाही तसेच अशा प्रकारच्या अफवांमध्ये काही तथ्यदेखील नाही. माझ्याशी तसे कुणी बोललेले नाही, मागणी नाही



तसेच अटदेखील घातलेली नसल्याचे राष्ट्रवादी कँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळयांनी पत्रकारांशी झालेल्या वार्तालापात सांगितले.

नाशिकच्या जागेची मागणी आमचे नेते अजीत पवार आणि प्रफुल्ल पटेल यांनी दिल्लीतील भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाशी बोलताना केली होती. त्यावर त्यांनी ती जागा हवी असेल तर घ्या पण तिथून भुजबळ यांनाच निवडणूक लढवायला सांगावे, असे सांगितल्याचा संदेश मला मिळाला होता. मात्र, त्यानंतरच्या चर्चेत कुणीही माझ्याकडे कमळ चिन्हावर लढण्याचा आग्रह किंवा प्रस्तावही दिलेला नसून तशी कोणतीही अटदेखील घातलेली नाही. उमेदवाराच्या नावाची घोषणा ही तिन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते मिळून करणार आहेत. त्यामुळे ती घोषणा कधी होणार त्याबद्दल मला काही फारशी माहिती नाही.

## सहकार क्षेत्रातील अनेक संस्था अडचणीत : रावसाहेब देसाई



**शिरोळ :** सहकार क्षेत्रातील अनेक संस्था अडचणीत असतानाही कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नेमगोंडा पाटील यांनी कल्पक बुद्धीतून सहकार क्षेत्रात आदर्श कार्य सुरू ठेवले आहे . त्यांच्यामुळेच कल्पद्रुम पतसंस्थेचा लौकिक वाढला आहे . गरीब अथवा श्रीमंत असा भेदभाव न ठेवता केवळ सहकारातून लोकहिताचा विचार केला जातो . संस्थेने प्रामाणिकपणा व विश्वासार्हता अधिक चांगल्या पद्धतीने जपल्यामुळे हसूर सारख्या ग्रामीण भागातील पतसंस्थेची शिरोळ शहरात तिसरी शाखा सुरू करून आदर्श निर्माण केला आहे . या चांगुलपणा विषयी अभिमान वाटतो , असे मत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे राष्ट्रीय अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी व्यक्त केले

येथील श्री समर्थ मंगल कार्यालयानजीक कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्थेच्या (हसूर ) शिरोळ शाखेचा शुभारंभ शिवप्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष देसाई यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक - चेअरमन नेमगोंडा पाटील यांनी स्वागत करून शिरोळमध्ये संस्थेची तिसरी शाखा कार्यान्वित झाली असून संस्थेचे वसुली भाग भांडवल १ कोटी ३६ लाख रुपये आहे. २५ कोटी ४६ लाख रुपये ठेवी असून एनपीए शून्य टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दत्त साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव पाटील यांच्यासह सामाजिक , राजकीय व सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन संस्थेचे चेअरमन पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना सर्वसाधारण सूचनांचे पालन करावे

## पुणेचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचे आवाहन

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना सर्वसाधारण सूचनांचे पालन करावे व योग्यरितीने नामनिर्देशनपत्र दाखल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

नामनिर्देशनपत्र निवडणूक अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत स्वीकारले जाणार आहेत. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार नाहीत. नामनिर्देशनपत्र हे नमुना २अ मध्ये दाखल करावे, त्यासोबत नमुना २६ मधील प्रतिज्ञापत्र सादर करावे. नामनिर्देशनपत्राचा नमुना २अ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. नमुना २६ मधील प्रतिज्ञापत्र पूर्णपणे भरलेले असणे आवश्यक आहे.

एका उमेदवारास अधिकाधिक ४ नामनिर्देशनपत्र दाखल करता येतील. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १७३ (अ) अन्वये उमेदवाराने स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी किंवा प्राधिकृत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष छाननीपूर्वी शपथ घ्यावी लागेल. दोनपेक्षा अधिक लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नाही. नामनिर्देशनपत्र दाखल करणारे उमेदवाराचे वय २५ वर्षापेक्षा कमी नसावे.

उमेदवार निवडणूक लढवीत असणाऱ्या लोकसभा मतदारसंघाव्यतिरीक्त, इतर लोकसभा मतदारसंघातील मतदार असल्यास, ज्या लोकसभा मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये उमेदवाराचे नाव आहे, त्या मतदारयादीची प्रमाणित प्रत नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करणे बंधनकारक राहील. उमेदवार स्वतः किंवा त्यांचे कमीत कमी एका प्रस्तावकाने स्वतः उपस्थित राहून नामनिर्देशनपत्र दाखल करावे.



नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारीयांचे कार्यालयात उमेदावारासहीत एकूण ५ व्यक्तींनाच प्रवेश दिला जाईल. (त्यामध्ये उमेदवार व त्यांचे चार प्रतिनिधी यांनाच प्रवेश देण्यात येईल.) नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवाराच्या केवळ ३ वाहनांना कार्यालयाच्या परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे. वाहने वाहनतळावरच उभी करण्याची अनुमती राहील.

उमेदवार हा ज्या लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहे त्याच लोकसभा मतदारसंघातील मतदार हे प्रस्तावक असणे बंधनकारक राहील. मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आणि महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षाच्या उमेदवारास १ मतदार प्रस्तावक म्हणून असणे बंधनकारक राहील. अपक्ष उमेदवार आणि इतर राज्यातील मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्षाचे उमेदवार यांना मतदारसंघातील १० मतदार प्रस्तावक म्हणून असणे बंधनकारक राहील.

प्रस्तावक अशिक्षीत असल्यास, त्यांनी त्यांचा अंगठा (ठसा) हा निवडणूक निर्णय अधिकारी किंवा विनिर्दिष्ट सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या उपविभागीय अधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यासमोर जाऊन त्यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक राहील.

प्रपत्र-२६ मधील शपथपत्र न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग किंवा नोटरी पब्लिक किंवा उच्च न्यायालयाने शपथपत्र करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या शपथ आयुक्त यांचेसमोर केलेले असणे बंधनकारक राहील. शपथपत्राच्या प्रत्येक पृष्ठावर उमेदवाराची (अभिसाक्षीची) स्वाक्षरी आवश्यक आहे. या व्यतिरिक्त शपथपत्राच्या प्रत्येक पृष्ठावर नोटरी किंवा शपथ आयुक्त किंवा दंडाधिकारी ज्यांच्या समक्ष शपथपत्र सत्यापित केले गेले असल्यास त्यांचा शिक्का असणे आवश्यक राहील.

नामनिर्देशनपत्रासोबत विहित नमुन्यातील शपथपत्र हे १०० रुपयांच्या मुद्रांक कागदावर देणे बंधनकारक राहील. शपथपत्रातील सर्व माहिती किंवा रकाने पूर्णपणे भरलेले असावे. शपथपत्रातील माहिती टिक, डॅश केलेली ग्राह्य धरली जाणार नसून त्यामध्ये निरंक (निल) किंवा लागू नाही (नॉट ॲप्लिकेबल) अशी स्पष्ट माहिती नमूद करणे बंधनकारक राहील.

उमेदवारांनी मागील १० वर्षाच्या कालावधीत शासनाने वाटप केलेल्या निवासस्थानाचा ताबा घेतला असल्यास, शासकीय निवासस्थानाचे भाडे, विद्युत, पाणीपट्टी, दूरध्वनी आकारणी केल्याबाबत संबंधित यंत्रणेचे 'ना देय प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक राहील.

राजकीय पक्षाच्या उमेदवाराने प्रपत्र 'ए' आणि 'बी' यांची मूळ शाईची स्वाक्षरीत प्रत पक्षाचे मोहोरेसह नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करणे बंधनकारक राहील.

सर्वसाधारण उमेदवारांसाठी अनामत रक्कम २५ हजार रुपये व उमेदवार अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गातील असल्यास १२ हजार ५०० रुपये भरल्याची पावती किंवा चलनाची प्रत नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

ह्या सर्वसाधारण स्वरुपाच्या असून नामनिर्देशनपत्र दाखल करताना भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व तरतूदीनुसार परिपूर्ण नामनिर्देशनपत्र भरण्याची व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे दाखल करण्याची अंतिम जबाबदारी ही उमेदवाराची राहील, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी दिली आहे.

## / गुन्हे वृत्त... /

### राहत्या घरातून एकजण बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एकजण बेपत्ता झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ४ रोजी सकाळी पावणे आठच्या सुमारास आप्पा नारायण लोंढे रा. न्यू विकास नगर, सातारा हे राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेले आहेत. अधिक तपास पोलीस हवालदार यादव करीत आहेत.

### अवैधरित्या दारू विक्री प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** अवैधरित्या दारू विक्री प्रकरणी सातारा तालुका पोलिसांनी एकावर कारवाई केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ९ रोजी संध्याकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास लहू बाबुराव भोई रा. तासगाव, ता. सातारा हे राहत्या घराच्या आडोशाला अवैधरित्या दारू विक्री करताना आढळून आले. त्यांच्याकडून ७५० रुपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

### आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** हद्दपार आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ८ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सुश्वित तानाजी सावंत रा. सदर बाजार, सातारा हा हद्दपार असताना आदेशाचा भंग करून कोणाच्याही लेखी परवानगीशिवाय एमआयडीसी येथील बिरोबा मंदिराजवळील मोकळ्या जागेत आढळून आला. अधिक तपास महिला पोलीस हवालदार गोसावी करीत आहेत.

### आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तडीपारीचे आदेश असतानाही त्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी अक्षय सुर्यकांत पवार (वय २६, रा. मस्करवाडी पो. आंबवडे ता.सातारा) याच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शहर पोलिसांनी ही कारवाई दि. ८ एप्रिल रोजी एमआयडीसी येथे केली आहे.

# संपूर्ण राज्यात मोदींची हवा : दिनेश शर्मा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्यातील १८ लोकसभा मतदारसंघांना भेट दिली. संपूर्ण राज्यात मोदींची हवा आहे. मोदींच्या जादूमुळे जनता आणि नेत्यांवर व्यापक प्रभाव दिसून येतो. ही पहिली निवडणूक आहे जिथे राजकीय पक्ष लढत नसून जनताच लढत आहे. विदर्भात पहिल्या टप्प्यातील पाचही जागा लाखांच्या फरकाने एकतर्फी जिंकू. हेच वातावरण संपूर्ण राज्यात आहे, असे उत्तर प्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री, राज्यसभा खासदार, महाराष्ट्र भाजपा निवडणूक प्रभारी दिनेश शर्मा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार माधुरी मिसाळ, शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, चिटणीस वर्षा डहाळे यांची उपस्थिती होती.



भाजपा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामध्ये उत्तम समन्वय आहे. आघाडीची बिघाडी झाली आहे. एकमेकात स्पर्धा आहे, ती एनडीएत नाही. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांबरोबर वॉर्ड स्तरीय स्थानिक कार्यकर्तेही भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. महाराष्ट्रात महाआघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये निती, नियम आणि नेतृत्वाचा अभाव आहे. भाजपमध्ये मोदींच्या गॅरंटीची नीती आहे, राष्ट्रवादाचा नियम आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आहे. याउलट शिवसेना, राष्ट्रवादी पक्षांमध्ये परिवारवाद आणि स्वतःच्या परिवाराची काळजी आहे. भाजपचा परिवार म्हणजे सर्वसामान्य जनता आणि मोदींचा परिवार आहे.

डबल इंजिन सरकारमुळे विकासाला गती मिळाली आहे. मागे निवडणूक भाजप, शिवसेना एकत्र लढली. परंतु उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व आणि सनातनाचा चेहरा उतरून फेकून दिला. ते पवारांच्या जाळ्यात अडकले. राम मंदिराचा शिलान्यास होत असताना, हनुमान चालीसाचे पठन करणाऱ्यांनाही उद्धव ठाकरे यांनी तुरुंगात टाकले, कंगना राणावत चे घर मोडले गेले, पालघर येथे साधूंची हत्या केली, सोशल माध्यमातून व्यक्त होणाऱ्यांना तुरुंगात टाकले, अशा शब्दांत शर्मा यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस एकमेकांना संपवत आहेत. केडर बेस्ट भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसभा निवडणुकीत दोनदा पराभव केला. भाजपने डॉ. आंबेडकर यांच्या पंचतीर्थांचे संवर्धन केले आणि उद्धव ठाकरे यांचे आचरण राम विरोधी आहे. परिवारवादी आणि राष्ट्रवाद अशी लढाई आहे. ४ जूनला जेव्हा लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होतील तेव्हा विरोधी पक्ष नेत्यांची सीट खाली असेल. मोदींवर विश्वास दाखविल्याबद्दल राज ठाकरे यांना धन्यवाद देतो. राज्यातील ४८ जागांवर पंतप्रधान मोदी उमेदवार म्हणून लढत आहेत सर्व जागांवर मोदी जिंकणार आहेत, असा विश्वासही शर्मा यांनी बोलून दाखविला.

# 'डायल ११२'वर खोटा कॉल; पोलिसांकडून गुन्हा दाखल

**राजदंड / शिरवळ**

शिरवळ येथे एका २८ वर्षीय तरुणाने चृढ डायल ११२ वर खोटा कॉल करून पोलिसांना नाहक त्रास दिल्या प्रकरणी शिरवळ पोलिसांनी तरुणावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१० रोजी १ वाजता, शिरवळ पोलीस ठाण्यातील सहा फौजदार विलास यादव यांना चृढ डायल ११२ वरून कॉल आला.कॉलरने त्याने मर्डर केल्याची आणि त्याला अटक करण्याची मागणी केली. कॉलरने फोन बंद केल्याने आणि पुन्हा कॉल केल्यावर योग्य माहिती न दिल्याने, पोलिसांनी वरिष्ठांना कळवून घटनास्थळी पोहोचले.घटनास्थळी फार्महाउस मालकाला विचारले असता त्यांनी मर्डर सारखी घटना घडल्याचे नाकारले.कॉलरला पुन्हा फोन केल्यावर त्याने वेगवेगळी ठिकाणे सांगितली.

शेवटी फोन करणाऱ्या तरुण सटवाई कॉलनी, शिरवळ येथून शुभम उर्फ सोन्या रमेश पंडित (वय २८ वर्षे ताब्यात घेण्यात आले.चौकशीत त्याने खोटा कॉल केल्याची कबुली दिली.

त्यानुसार शुभम उर्फ सोन्या रमेश पंडित (वय २८ वर्षे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आली आहे.तर पुढील तपास शिरवळ पोलिस स्टेशनचे पोलीस हवालदार केगले करीत आहेत. नागरिकांनी 'डायल ११२' वरसारख्या महत्त्वपूर्ण सेवांचा गैरवापर करू नये. खोटी माहिती देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. या घटनेमुळे पोलिसांवर अनावश्यक दबाव निर्माण होतो. नागरिकांनी जबाबदारीने वागावे, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

पान १ वरून

### महिलेवर अत्याचार करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

२६ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम अशी सुमारे १३ लाखांची फसवणूक केली. तसेच संबंधित महिलेच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत.

### तृतीयपंथांच्या गैरवागणुकीवर नवी नियमावली जाहीर

मागण्यास मनाई राहील. लग्न, बारसे, अंत्यविधी, उत्सव अशा कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये निमंत्रणाशिवाय जाता येणार नाही. मुख्य चौकांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी पैशांची मागणी केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास खंडणीचा गुन्हाही दाखल करण्यात येणार आहे. भिक्षेकऱ्यांकडून लहान मुलांचा वापर करणे गंभीर गुन्हा आहे. अशा भिक्षेकऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त यांनी दिला.

### भाजपकडून लोकशाही संपविण्याचा घाट - विक्रमसिंह पाटणकर

जीएसटी सारखा चाजक कर लावला आहे. या भाजपा सरकारनं फक्त पक्ष फोडाफोडी करण्याचा धंदा सुरु केला आहे. सरकारी यंत्रणांचा वापर करुन इतर पक्षांतील घोटाळेबाज, भ्रष्टाचारी नेते आपल्या पक्षात घेऊन स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयीचा पवित्र भाजपा पक्ष या मोदी-शहांनी बाटवला आहे. जनतेची जराही काळजी नसलेलं हे सरकार आहे. हे सरकार उलथून टाकण्याची संधी या लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला आता आली आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन हे जुलमी सरकार घालवून आपला देश वाचवूया असे आवाहन त्यांनी उपस्थित जनसमुदायास केले.

याप्रसंगी बोलताना सत्यजित पाटणकर म्हणाले, जर पक्षाने संधी दिली तर सातारा लोकसभा निवडणुक लढवायची माझी पुर्णपणे तयारी आहे. परंतु जर पक्षाने आ.बाळासाहेब पाटील, आ.शशिकांत शिंदे, सुनील माने, दिपक पवार यांच्यासारखा चांगला पर्याय दिला तर नक्कीच त्यांच्याही पाठीशी संपूर्ण ताकदीनिशी उभं राहून काम करु. परंतु पक्षाच्या तिकिटावर लढून आमच्या मेहनतीवर निवडून येऊन आमचेच पाय खेचणारा, आमच्याच विरोधकांना सहकार्य करणारा उमेदवार नको असंही त्यांनी यावेळी सांगितले. आमचे नेते आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांचा पाठीवरील हात आणि आदरणीय विक्रमसिंह पाटणकर दादांचे आशीर्वाद आमच्यासाठी नेहमीच उर्जा देणारे आहेत. संपूर्ण पाटण विधानसभा मतदारसंघ शरद पवार साहेबांच्याच मागे आजही ठामपणे उभा आहे. या नवी मुंबईतील नुतन पक्ष कार्यालयाच्या माध्यमातून पक्ष व संघटना अजून मजबूत होणार आहे.

या संवाद मेळाव्यासाठी पाटण विधानसभा मतदारसंघातील सर्व संस्थांचे चेअरमन,व्हॉ. चेअरमन, संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व सेलचे आजी/माजी प्रमुख पदाधिकारी, आजी/माजी जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य, जेष्ठ कार्यकर्ते, पाटण तालुका मित्रमंडळ, मुंबई चे पदाधिकारी आणि सदस्य व मुंबई येथील पक्षाच्या कार्यकर्ते, नवी मुंबई व ठाणे परिसरात रहिवासी असणारे पाटणवासीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'गीत सुमनांजली' भावगीत मैफिल १३ एप्रिलला

## भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनचा उपक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'गीत सुमनांजली ' या भावगीत मैफिलीचे दि.१३ एप्रिल २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ व्हायोलिनवादक पं. प्रभाकर जोग आणि ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या गाजलेल्या भावगीतांचे सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.वीणा जोगळेकर,दीपक कुलकर्णी हे भावगीते सादर करणार आहेत.चारुशिला गोसावी (व्हायोलिन ),ओमकार पाटणकर (तबला),उद्धव कुंभार (साईड रिदम) हे साथसंगत करणार आहेत. स्मिता अमृतकर या कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार,१३ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी साडे पाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.हा कार्यक्रम विनामूल्य आहे.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २०१ वा कार्यक्रम आहे.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी ही माहिती दिली.

# नरेंद्र मोदी यांनी केलेले काम काँग्रेसला ५० वर्षात जमले नाही

## ■ पुण्यातील महायुतीच्या मेळाव्यातून मुख्यमंत्र्यांचा हल्लाबोल

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जो मतदार आपला असतो तो आपल्याला काही ना काही बोलतोच की याने अस नाही, केल त्याने तसं नाही केल...ज्याला आपल्याला मतदान करायचं नसत तो गप्प बसतो. परंतु, जो बोलणारा असतो तो आपलाच मतदार असतो त्याच्यावर तुम्ही बिलकुल नाराज व्हायचं नाही. आज मला एवढच सांगायचं आहे की आपल्या राज्यसरकारने केलेली काम आपल्या समोर आहेत. नरेंद्र मोदी यांनी मागील दहा वर्षात केलेले काम हे काँग्रेसला मागील ५० वर्षात जमले नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

पुण्यातील महायुतीच्या मेळाव्यातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

जगात देशाची प्रतिमा उंचावली असून देश बोलतो ते जग ऐकत आहे असे वातावरण आहे.



कोरोना काळात काही लोक घरात बसून होते ते नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत आहे. त्यांनी वक्रदृष्टी केल्यास फेसबुक लाईव्ह करणाऱ्यांच्या तोंडाला फेस येईल. कार्यकर्ता ज्यावेळी सक्रिय होतो तेव्हा सर्वत्र राज्यात महायुती वातावरण दिसून येत आहे. आता मनसेने आपल्याला पाठिंबा दिला आहे, आपली ताकद मोठी आहे. आपल्या महायुतीचं वातावरण राज्यभर आहे. पुणे लोकसभेचे उमदेवार मुरलीधर मोहोळ आणि इतर आपले सगळे उमेदवार रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी होतील, कारण आपले कार्यकर्ते चार्ज आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. गेल्या ३० वर्षांपासून आपली नैसर्गिक युती आहे. त्यामध्ये काही विघ्न आली, पण आपण पुन्हा युती केली आणि आता अजित पवार सोबत आले. आपली महायुती मजबूत झाली. अनेक लोक म्हणत होते की सरकार पडणार पडणार, आता बंद झालं आहे असं म्हणणं. मुरलीधर मोहोळ यांना गिरीश बापट यांचा वारसा पुढे चालवायचा आहे. माझेही आणि त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. गिरीश बापट मला मोठ्या भावसारखे होते. आता आपला खासदार पुण्यातून दिल्लीला जाणार आहे. इथं भाऊ तात्या कुणी नाही मुरली अण्णाच निवडून येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी निक्षून सांगितले. मोहोळ यांना कुटुंबातून पैलवान असल्याचा वारसा आहे. पण ते वाटत नाहीत पैलवान आहेत. त्यांना कुठला डाव कधी टाकायचं हे सर्व माहिती आहे आणि स्वार्थासाठी राजकीय आखाडा बदलणारा माणूस आपल्याला नको आहे.

# हडपसर सय्यदनगर भागात 'रमजान ईद' उत्साहात साजरी

## हांडेवाडी रोड, श्रीराम चौक रस्त्यावर रमजान ईद निमित्त सार्वजनिक नमाज पठण

**हडपसर : प्रतिनिधी**

हडपसर सय्यदनगरमधील भागात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. सय्यदनगर हांडेवाडीरोड रस्त्यावर श्रीराम चौकात तसेच ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी सार्वजनिक नमाज पठण करून एकमेकांना अलिंगन देत रमजान ईदच्या सुभेच्छा दिल्या.

रमजान ईद निमित्त सय्यदनगर व परिसरातील सर्व मुस्लिम बांधव नागरिकांनी सय्यद नगर येथील ईदगाह मैदानात सार्वजनिक नमाज पठनाचा कार्यक्रम पार



पडला, नमाज पठण कार्यक्रमा प्रसंगी मा.नगरसेवक फारूक भाई इनामदार,रफिक भाई इनामदार,अयाज भाई इनामदार,सुफीयान भाई इनामदार,ॲड.शाहेबाज मणियार, प्रा.सोहेब इनामदार, प्रा.शफी इनामदार मुस्लिम समाज उपस्थितीत होता.

यावेळी वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पतंगे साहेब, पो. नि.भोसले साहेब व पोलीस स्टाफ चोख बंदोबस्तासाठी उपस्थित होता.

रमजान ईद निमित्त सय्यदनगर रस्ता विद्युत रोषणाई, विविध रंगीत मंडपानी तसेच विविध खाद्यपदार्थांनी सजलेला होता.कांही ठिकाणी हिन्दु मुस्लिम ऐकोपाचे दर्शन घडताना दिसत होते, हिन्दु बांधवाना शिरकुर्मा पिण्यास देत होते.

### जुगार प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** सातारा शहर पोलिसांनी जुगार प्रकरणी एकावर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ९ रोजी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सुजल रवींद्र धनावडे रा. गोडोली, सातारा हा गोडोली येथील पशुसंवर्धन ऑफिस शेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला जुगार घेताना आढळून आला. त्याच्याकडून ७५० रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

# '५ जी' आले तरी पाटण तालुक्यात 'बीएसएनल'चे '४ जी' चालेना..!

## ग्राहक त्रस्त

**राजदंड / पाटण**

आधुनिक काळात मोबाईच्या दुनियेत इंटरनेट शिवाय प्रयाय उरला नाही. प्रत्येकाला अँड्रॉइड मोबाईल व त्याबरोबर चालणारे इंटरनेट याची पावलागणिक आवश्यकता बासत आहे. इंटरनेट फास्ट होण्यासाठी केंद्र शासनासह इंटरनेट कंपन्या विविध उपाययोजना आणून २ जी, ४ जी, ५ जी च्या पुढे ७ जी आणण्याच्या प्रयत्नात आसताना पाटण तालुक्यात मात्र बीएसएनलचे ४ जी २ जी च्या वेगाने चालतंय. अधूनमधून २ जीला देखील सारखा ब्रेक लागतोय. याबाबत बीएसएनएलकडे ग्राहकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या, मात्र काहीएक फरक पडत नसल्याने बीएसएनएलचे ग्राहक त्रस्त झाले आहेत. यामुळे अनेक ग्राहक बीएसएनएल सोडून इतर कंपन्यांचा प्रयाय शोधू लागले आहेत.

पाटण तालुक्याचे ठिकाण असलेल्या पाटण शहरातच बीएसएनएलचे तीनतेरा वाजले आहेत. अनेक शासकीय कार्यालयात बीएसएनएलचे फायबर नेट आणि मोबाईल इंटरनेट सेवा चालू आहे. मात्र बीएसएनएलच्या




सावळ्या गोंधळामुळे व इंटरनेट सेवामुळे शासकीय कामात अडथळे निर्माण होत आहेत. सद्या सगळीकडे लोकसभा निवडणुकीची लगबग शासकीय यंत्रणेची सुरु आहे. याबरोबर पोलिस नोकर भरती, महावितरण नोकर भरती प्रक्रिया सुरू आहे. अशात बीएसएनएलच्या सततच्या अडथळ्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांसह नोकरभरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या तरुण-तरुणींचे हाल होत आहेत. इंटरनेटच्या सततच्या अडथळ्यामुळे वेळेत कोणतेच काम होत नसल्यामुळे अनेकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबतीत केंद्र शासनाच्या बीएसएनएल कंपनीला कोणतेही सोयरसूतक पडलेले नाही.

पाटण शहरात तर बीएसएनएलच्या मोबाईल टॉवर पासून अगदी शंभर-दोनशे मीटरच्या अंतरापर्यंत देखील इंटरनेट सेवा चालत नाही. बीएसएनएलचे टॉवर म्हणजे शो टॉवर झाले आहेत, अशी ओरड सध्या ग्राहकांची सुरू आहे. ज्या दिवशी शासकीय सुट्टी असेल अथवा विज पुरवठा खंडित असेल अशावेळी बीएसएनएलचे इंटरनेट सोडाच मोबाईल रेंज देखील गायब असते. या बाबतीत बीएसएनएलच्या कार्यालयाशी अनेकदा संपर्क साधला असता, ग्राहकांना पटेल असे उत्तर मिळत नाही. याबाबतीत वरिष्ठांनी लक्ष घालून बीएसएनएलची मोबाईल इंटरनेट आणि फायबर इंटरनेट सेवा सुरळीत करावी, अशी मागणी संतप्त ग्राहकाकडून होत आहे.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिरोळात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**शिरोळ :** विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त शाहूनगर येथील शाहू क्रीडा मंडळ व समस्त बौद्ध समाज यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रविवार दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ वाजता शाहूनगर येथे शितल कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील आणि तहसीलदार अनिलकुमार हेळकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे पोलीस निरीक्षक शिवाजी गायकवाड पालिकेचे मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होणार आहे पत्रकार चंद्रकांत भाट व बाळासाहेब कांबळे यांना आत्मसन्मान गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे शिरोळ परिसरातील लोकप्रतिनिधी माजी नगरसेवक विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत यानंतर रागिनी मधुकर दत्तवाडे यांच्या हस्ते दूध वाटप करण्यात येणार आहे यावेळी कुमार कांबळे जनार्दन कांबळे मच्छिंद्र कांबळे मारुती कांबळे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत या समारंभानंतर महिलांसाठी अमरदीप सहदेव कांबळे यांच्या स्मरणार्थ रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे विजेत्या स्पर्धकांना येवला पैठणी बक्षीस म्हणून दिली जाणार आहे मनीषा अमरदीप कांबळे यांच्या सहकार्याने होणाऱ्या रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन शकुंतला उर्फ रंजना प्रभाकर माने यांच्या हस्ते व आजी-माजी महिला पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार आहे

रविवारी सायंकाळी ५ वाजता संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित केली आहे निर्मला सुनील कांबळे यांच्या सहकार्याने होणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना येवला पैठणी बक्षीस म्हणून दिली जाणार आहे यानंतर फनी गेम्स हा करमुनिकीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे सिनेअभिनेता बसवराज टकळगी हे या कार्यक्रमाचे आयोजक आहेत जितेंद्र कांबळे यांच्या हस्ते मारुती कोळी सर्जेराव पुंदे अनंत महात्मे लक्ष्मण भोसले अनिल आवळे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे

सोमवार दिनांक १५ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता भोजनदान कार्यक्रम आयोजित केला आहे तरी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यासाठी जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष जनार्दन कांबळे उपाध्यक्ष प्रसाद कांबळे स्वागताध्यक्ष शिवाजी कांबळे औदुंबर कांबळे यशवंत कांबळे रतन कांबळे खजिनदार अशोक कांबळे सहखजिनदार यश शिरोळकर ऑडिटर हितेशकुमार कांबळे सहऑडिटर महेश कांबळे सहस्वागताध्यक्ष श्रीमंत कांबळे यांच्यासह सर्व सदस्य शाहू क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्य बौद्ध समाज बांधव विशेष परिश्रम घेत आहे

# माढ्यात राजकीय घडामोडींना वेग!

## धैर्यशील मोहिते पाटलांनी दिला भाजपा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा

**माढा :** लोकसभा मतदारसंघातून मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. भाजपानेते धैर्यशील मोहिते पाटील यांनी आज खासदार शरद पवार यांची पुण्यात भेट घेतली. तर दुसरीकडे रात्रीभाजपासदस्यत्वाचा आणि पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. हा भाजपासाठी पश्चिम महाराष्ट्रात मोठा धक्का मानला जात आहे.

मी माफी का मागावी? शाहू महाराज थेट वारसदार हे सिद्ध करा'; संजय मंडलिकांचा पलटवारभाजपाने लोकसभेसाठी पहिली यादी जाहीर केली, या यादीत भाजपने रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली. या उमेदवारीवरुन अकलूजचे मोहिते पाटील नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. यावरुन काही दिवसापासून जोरदार चर्चा सुरू होत्या. धैर्यशील मोहिते पाटील खासदार शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून निवडणूक लढवणार अशा चर्चा सुरू होत्या. दरम्यान, आज धैर्यशील मोहिते पाटील यांनी पुण्यात शरद पवारांची भेट घेतली. यानंतर ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे निश्चित झाले होते. आता त्यांनी भाजपाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.धैर्यशील मोहिते पाटील हातात तुतारी घेत निवडणुकीच्या रिंगणातउतरणारबहुचर्चितमाढालोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून कोण उमेदवार असणार याची उत्सुकता कायम आहे. ही जागा राष्ट्रवादीच्याशरद पवारगटाकडे असल्याने मागील काही दिवसांपासून अनेक नावांवर चाचपणी करण्यात आली. धैर्यशील मोहिते पाटील हे रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी मिळाल्यापासून नाराज होते. मोहिते पाटील समर्थकांनी अकलूजमध्ये बैठक घेऊन शक्तिप्रदर्शन केले होते. तेव्हापासून मोहिते पाटील हे पवारांसोबत जातील अशी चर्चा होती. त्यानंतर आज प्रत्यक्षात पुण्यात ही भेट झाली. त्यामुळे माढा लोकसभा मतदारसंघातभाजपाचीमोठी डोकेदुखी होणार आहे. १३ एप्रिलला धैर्यशील मोहिते पाटील



हे अकलूज इथं शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करून हातात तुतारी घेत निवडणुकीच्या रिंगणात उतरवणार हे आता जवळपास निश्चित मानलं जात आहे.

वेट अँड वॉच अन् मोहितेंना लागला गळ...

माढा मतदारसंघातील उमेदवारीचा विषय यावेळी मोठा चर्चेला आलेला आहे. महायुतीतील भाजपकडून खासदार रणजितसिंह यांना उमेदवारी मिळाली. विरोधामुळे त्यांची उमेदवारी चर्चेत आली. तर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादीचा उमेदवार ठरत नव्हता. त्यामुळेही चर्चा सुरू झाली. कारण, पक्षाकडे एकही प्रबळ उमेदवार नव्हता. यासाठी शरद पवार हे गळ टाकून होते. अकलूजचे मोहिते-पाटील भाजपमध्ये नाराज होते. त्यामुळे ते गळाला लागणार असा त्यांना अंदाज असावा. त्यामुळेच त्यांनी घाईने कोणतेही पाऊल उचलले नाही. काहीजणांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली. पण, त्यांनाही आधी मोहिते-पाटील यांचे काय होते ते पाहू असे सांगण्यात आले. त्यामुळे पूर्वीपासूनच राष्ट्रवादी व शरद पवार यांचा मोहिते-पाटील यांच्याकडेच कल होता. आता धैर्यशील यांचा राष्ट्रवादी प्रवेश झाल्यानंतर उमेदवारीची माळ त्यांच्या गळ्यात पडणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

धैर्यशील मोहिते-पाटील यांनी गुरुवारी पुण्यात शरद पवार यांची पुन्हा भेट घेतली. तेव्हाच स्पष्ट झाले की धैर्यशील हेच माढ्याचे उमेदवार राहणार. पण, त्यांनी अजून भाजपचा राजीनामा दिला नसलातरी येत्या दोन दिवसांत बऱ्याच राजकीय घडामोडी होणार आहेत. त्यानंतर ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. यामुळे राष्ट्रवादीकडून माढ्याची उमेदवारी ही धैर्यशील मोहिते यांनाच मिळणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. पुढील आठवड्यात सोमवारनंतर केव्हाही माढ्यासाठी राष्ट्रवादीकडून ते अर्ज भरू शकतात अशी माहितीही मिळत आहे.

# गांधीनगरच्या अपहृत व्यापाऱ्याची सुटका चौघांना अटक

## गुजरात पोलिसांची कारवाई : आर्थिक देवघेवीतून शक्यता

**राजदंड न्युज नेटवर्क**

गांधीनगर येथील भांडी विक्रीचे घाऊक व्यापारी हरचंद्रराम पुरोहित यांचे कोल्हापूर ते रत्नागिरी मार्गावरीलआंबवडे मार्गावरून रविवारी (दि. ७) रात्री अज्ञातांनी अपहरण केले होते. या प्रकरणी दिनेशकुमार मोबताराम पुरोहित (वय २६, रा. बाडा), ससेराराम कांतीलालजी पुरोहित (२४, रा. गावरोडा), संजय कुमार नरसिराम मेघवाल (२२, रा. माळवाडा) व महेंद्र रामाराम पुरोहित (२७, रा. वाडा, ता. राणीवाडा, जिल्हा जालौर, राज्यस्थान) या चौघांना अटक केली. आर्थिक देवघेवीतून अपहरण झाले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, पन्हाळा येथे त्यांना न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. हरचंद्रराम पुरोहित हे भांड्यांचे विक्री करणारे घाऊक व्यापारी असून, त्यांचे गांधीनगरमध्ये दुकान आहे. ते घाऊक दिलेल्या मालाचे पैसे आणण्यासाठी रविवारी पन्हाळा तालुक्यातील कोडोली गावात आले होते; पण ते उशिरापर्यंत दुकानात परतले नाहीत. त्यांच्या मुलाने घरी चौकशी केली. तेव्हा त्याला ते रात्री आठ वाजता कोडोली गावातून बाहेर पडल्याचे समजले.



घरी न परतल्याने मुलाने ते गेलेल्या रस्त्यावर वडिलांचा शोध घेतला. त्यावेळी कोल्हापूर ते रत्नागिरी मार्गावरील आंबवडे (ता. पन्हाळा) येथे गोल्डन पॅलेस हॉटेलजवळ त्याला वडिलांची मोटारसायकल किल्लीसह आढळली. त्याचवेळी पुरोहित यांच्या घरी रात्री गुजरात पोलिसांचा फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने आम्ही अहमदाबाद पोलिसांतून बोलत असल्याचे सांगितले. पुरोहित यांना संशयास्पद रीतीने अज्ञात व्यक्ती एका मोटारीतून नेत असल्याचे दिसल्याने त्यांची सुटका केल्याची माहिती दिली. तसेच त्यांना घेऊन जाण्यासाठी जवळच्या पोलिसांत फिर्याद देण्याची सूचना केली. त्यानुसार पुरोहित यांचा मुलगा दर्जाराम याने पन्हाळा पोलिसांत वडिलांचे आपहरण झाल्याची फिर्याद दिली. पोलिस निरीक्षक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार सलीम सनदी, पो. नाईक विलास जाधवर, बाबुलाल कोकणे, अंमलदार समीर पवार यांचे पथक अपहरण केलेल्या पुरोहित यांना आणण्यासाठी अहमदाबादकडे तातडीने रवाना झाले होते. आरटीओ चौक अहमदाबाद येथील ट्रॅफिक ठाण्यातील पोलिसांनी मंगळवारी रात्री साडेसात वाजता पुरोहित यांना पन्हाळा पोलिसांकडे सोपवले.

अहमदाबाद पोलिसांच्या समयसूचकतेमुळेच छडा

आंबवडे येथून अपहरण केल्यानंतर हरचंद्रराम यांना आरोपी चार चाकी गाडीतून अहमदाबादमधून घेऊन जात होते. त्यावेळी अहमदाबाद येथील ट्रॅफिक ठाण्यातील पोलिसांनी त्यांच्या संशयास्पद गाडीची झडती घेतली. गाडीत बंद अवस्थेतील मोबाईल सापडल्याने पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी विचारलेल्या

# औरवाड येथील राजीव पतसंस्थेच्या चेअरमनला कर्नाटकातून अटक

**कुरुंदवाड :** औरवाड येथील राजीव बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या साडेपाच कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणातील संशयित आरोपी, संस्थेचे चेअरमन प्रताप आगरे यांना कुरुंदवाड पोलिसांनी बुधवारी पहाटे कर्नाटक राज्यातील ऐनापूर येथून अटक केली आहे.

औरवाड येथील राजीव पतसंस्थेत मार्च २०२४ रोजी झालेल्या लेखापरीक्षण अहवालात तत्कालीन चेअरमन,सचिव,कॅशियर सर्व संचालक सराफ यांनी संगनमत करून केलेला आर्थिक अपहार उघडकीस आल्याने अवसायकाने त्यांच्याविरुद्ध फसवणूक करणे,दंडनीय विश्वासघात,व्यक्तिमत्वाद्वारे फसवणूक, अप्रामाणिकपणे फसवणूक करून मालमत्ता लपवणे, खोटी कागदपत्रे,खोटे इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड तयार करणे, बनावट कागदपत्रे तयार करणे, फसवण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केलेप्रकरणी चेअरमन, कॅशिअर सोनारासह १२ संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील दोन संचालक व एका सोनाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. इतर संशयित आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात



आली होती.

दरम्यान आज गुरुवारी पहाटे कर्नाटक राज्यातील ऐनापूर येथून संस्थेचे चेअरमन प्रताप आगरे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. इतर संशयित आरोपींच्या शोधासाठी कुरुंदवाड पोलीस ठाण्याची पथके रवाना करण्यात आली आहे.

ही कारवाई कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस, पोलीस उपनिरीक्षक सागर पवार, सागर खाडे, संतोष साबळे सचिन पुजारी नागेश केरीपाळे आदींनी केली.

दरम्यान विद्यमान चेअरमन प्रताप आगरे यांना कुरुंदवाड येथील प्रथम न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर उभे केले असता त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे अधिक तपास सपोनी रविराज फडणीशे करीत आहेत.

# पन्हाळागडावर रमजान ईद उत्साहात



**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा:** मुस्लीम बांधवांची पवित्र रमजान पन्हाळगडावर उत्साहात साजरी करण्यात आली. बुधवारी रात्री चंद्रदर्शन झाल्यानंतर गुरुवारी ईद होणार हे निश्चित झाले.त्यामुळे बुधवारी रात्री पासुनच भक्तिमय वातावरण गडावर झाले होते.

गुरुवारी सकाळी पन्हाळ्यातील मुस्लीम बांधव हजरत पीर शहादुद्दीन खत्तालवली दर्गा मस्जिद येथे ईदुल फितर ची नमाज अदा करण्यासाठी एकत्रित जमा झाले. त्यानंतर ईदगा येथे सकाळी ईदनिमित्त नमाज समस्त मुस्लिम बांधवांच्या वतीने अदा करण्यात आली. मौलाना अब्दुल कादिर यांच्या नेतृत्वाखाली ईदची नमाज पठण करण्यात आले.यावेळी खुदबाचे देखील पठण होवुन विश्वशांती साठी दुआ करण्यात आला.यानंतर मुस्लीम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.यावेळी इदगाह येथे पन्हाळा पोलिसांच्यावतीने मुस्लीम बांधवांना गुलाबपुष्प देवुन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पोलिस निरीक्षक महेश इंगळे,बाजीराव चौगले,गोपीनय विभाग प्रमुख सचिन पाटील,मुस्लीम जमातचे अध्यक्ष असिफ मोकाशी,दर्गा ट्रस्टी अब्दुलसत्तार मुजावर, इर्शाद मुल्ला,मोहसीन मुजावर,माजी नगरसेवक अख्तर मुल्ला,नियाज मुल्ला,शकील देशाई, यांच्यासह मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकार्यांची चौकशी करून कारवाई करा : सुनिल कुरंदवाडे

**शिरोळ :** शिरोळ तालुका शिरोळ येथे निबंधक कार्यालयामध्ये अनागोंदी प्रकरणाची व खरेदी दस्त प्रकरणाची खरेदी होत नसताना मार्ग काढून अशा अनेक खरेदीपत्र आर्थिक देवाण-घेवाण करुन मोठमोठ्या खरेदी दस्त करून ग्राहकांची लाखो रुपयांची लुटमार करुन त्यांची फसवणूक होत असल्याने याबाबत या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोक जनशक्ती पार्टी किसान सेल चे जिल्हाध्यक्ष सुनील कुरुंदवाडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शिरोळ तालुका शिरोळ येथील दुय्यम निबंधक अधिकारी व या कार्यालयाकडून शिरोळ तालुक्यातील येणारे खरेदी विक्री दस्त केले जातात. एक एक दस्त खरेदी होत नसतानासुध्दा उदा. गुंठेवारी देवस्थान जमणे आहे. वर्ग दोन जमीनी अशा न खरेदी होणा-या जमीनीची खरेदीसाठी मार्ग या कार्यालयात काढला जातो. व यासाठी लाखानं रुपये घेतले जातात. व सदर खरेदीचा बेकायदेशीर मार्ग काढून खरेदी विक्रीपत्र केले जातात. यासाठी अधिका-यापासून कर्मचा-यापासून रक्कम ठरवून घेतले जाते. असा प्रकार अनेक वर्ष सुरु आहे. येथील अधिकारी व कर्मचारी रोजच्या रोज कामावरुन निघताना दहा हजार पासून एक लाखा पर्यंतची रक्कम ग्राहकाकडून लुटली जाते. अशाप्रकार या कार्यालयात सुरु आहे. जो ज्यादा रक्कम देईल त्याचे लगेच खरेदी दरताला नं. लावाला जातो. तसेच मिळकतीचे मुल्यांकन करुन त्या वर्गकरणे कोर्टकामी एखादया व्यक्तीला जामीन होण्यासाठी तहसीलदार यांच्याकडून ऐपत दाखला घेण्यासाठी मिळकतीचे मुल्यांकन करण्याकरीता तहसील कार्यालयात स्वतः यत्रंणा कार्यालयात करावी. जेणेकरुन मिळकतीचे मुल्यांकन करीता दुयम कार्यालयांला हेलपाटी मारावे लागणारे नाही. मिळकतीचे मुल्यांकन करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने मार्गदर्शन, मार्गदर्शक सुचना जाहिर केले आहेत. या सुचनेनुसार दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी मिळकतीचे मुल्यांकन निश्चित करुन मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसुल करतात.

मिळकतीचे मुल्यांकन केवळ खरेदी विकीच्या काम करीत असल्याची माहिती दुख्यम निबंधक कार्यालयाच्या अधिका-याकडून देतात. एखादया ग्राहकाला आपल्या मिळकतीचे मुल्यांकन हवे असल्यास सात बारा उतारा, झोन दाखला, व शंभर रुपयेचे चलन अर्जासोबत जोडावे लागते. मिळकतीचे सक्षम कागदपत्राची पडताळणी करुन मुल्यांगन केले जाते. सदर मुल्यांकन दाखल्यामध्ये सदर दाखल्याचा उपयोग केवळ खरेदी विक्की दस्तऐवज कामे करण्याचा आहे. इतर कारणासाठी वापर केल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही, अशी टिप्पणी सदर मूल्यांकन दाखल्यामध्ये दुव्यम निबंधक अधिकारी नमूद करतात. यामुळे तहसील कार्यालयाकडून मिळकतीचे मूल्यांकन, दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करून आणा, ही बाब कितपत योग्य आहे. याबाबत उलट सुलट चर्चा आहे.

जर दाखला केवळ खरेदी विक्रीसाठी, देण्याचा अधिकारी दुय्यम निबंधकांना असेल तर अशा दाखल्याचा आधारे, तहसील कार्यालयातून अथवा शासनाच्या अन्य महसूल कार्यालयातून मिळकतीचे रुपांतर वर्ग १ मध्ये करण्यायकरीता, मूल्यांकन दाखला ग्राह्य कसा धरला जातो तसेच लायक दाखल्या कमी देखील मुल्यांकन दाखला, दुय्यम निबंधक कार्यातील ग्राह्य कसा धरला जातो याबाबत मोठे गोड बंगाल असल्याचे बोलले जात आहे. आर्थिक घडामोडी आणि कमी मूल्यांकन शासनाचा महसूल बुडवण्यासाठी (२३) च्या माध्यमातून काही ऐजंट अर्थपूण घडामोडी करुन मूल्यांकन कमी करण्याचे अनेक प्रकरणी शिरोळपासून कोल्हापूर जिल्हयापर्यंत जात आहे. कं. २३ खाली विविध युक्त्या लढवून शासनाच्या मोठ्या प्रमाणात महसूल बुडवण्याचे काम शिरोळ कार्यालयामध्ये अशा अनेक खरेदीपत्र आर्थिक देवाण-घेवाण करुन मोठमोठ्या खरेदी दस्त करुन ग्राहकांची लाखो रुपयांची लुटमार करुन त्यांची फसवणूक होत असल्याने याबाबत या कार्यालयाच्या अधिका-यावर तातकाळ चौकशी करुन कारवाई करावी. अन्यता या प्रकरणी तीव्र स्वरुपाचे आंदोलन केले जाईल. याची गांभीराण्याने दखल घ्यावी, अशी मागणी कुरुंदवाडे यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

# हातकणंगले लोकसभा मतदार संघ वार्तापत्र

**शिरोळ :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून शिरोळ तालुक्यामध्ये सर्वच उमेदवार व नातेवाईकांनी पायाला भिंगरी बांधून घर ते घर प्रचार करताना दिसत आहेत तर प्रचारा आधीच्या या प्रचाराची झलक शिरोळ तालुक्यातील मतदारांना पहावयास मिळत आहे

प्रारंभी विद्यमान खासदार धैर्यशील माने व माजी खासदार राजू शेट्टी यांच्यात ही निवडणूक दुरंगी होईल असे वाटत असतानाच महाविकास आघाडीने माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांना मैदानात उतरवण्याचे ठरविले आहे तर वंचित बहुजन आघाडी तर्फे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डीसी पाटील हे लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेस एकंदरीत ही निवडणूक चौरंगी होईल असे वाटत असले तरी भारतीय जनता पक्षाने अद्याप आपले अधिकृत भूमिका जाहीर केली नाही कारण भाजपा हा महायुतीत असला तरी धैर्यशील माने यांच्या विषयी प्रचंड नाराजी या पक्षामध्ये दिसून येते वेळोवेळी त्यांनी तशी प्रगट ही केली आहे

सर्वप्रथम शिरोळ तालुक्यामध्ये लोकसभा निवडणुकी करिता माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी ची संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी प्रचाराला जोरदारपणे सुरुवात केली आहे आज अखेर शिरोळ तालुक्याचा त्यांनी दोनदा दौरा पूर्ण केला आहे वाढलेली महागाई सत्ताधारी पक्षाचा भ्रष्टाचार सामान्यांचे प्रश्न सोडविण्यास त्यांना आलेले अपयश शेतकऱ्यांचे प्रश्न घटना बदलण्याचा प्रयत्न हे प्रचाराचे मुद्दे आणत त्यांनी सुरुवातीस महाविकास आघाडीचा पाठिंबा घेतील असे वाटत होते मात्र त्यांनी एकला चलो रे ची भूमिका सध्या तरी त्यांची दिसत आहे महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार धैर्यशील माने यांचे कुटुंब प्रचारात उतरले असून माजी खासदार निवेदिता माने सौभाग्यवती वेदांतिका माने यांनी घर ते घर प्रचार सुरू केला असून धैर्यशील माने यांनी खासदारकीच्या कामाकाळात केलेल्या विकास कामाची शिदोरी बरोबर राज्य व केंद्र शासनाने केलेली विकास कामे व सामान्यांच्यासाठी राबवलेले धोरणे शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदींना पुन्हा एकदा पंतप्रधान करावयाचे असे मुद्दे प्रचारात आणले आहेत


महाविकास आघाडीतून अनेक जण इच्छुक होते मात्र अखेर माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांच्या गळ्यात उमेदवारी पडली तेव्हापासून त्यांनी प्रचारास सुरुवात केली आहे केंद्र व राज्य शासनाचा भ्रष्टाचार सा प्रदायिकतेचे केंद्रीकरण संविधान बदलण्याची चर्चा याबाबत केंद्र शासनाची भूमिका आदी मुद्दे त्यांनी प्रचारात आणले असून सामान मतदारांच्या बरोबर नातेवाईक यांच्याशी त्यांनी मोठा संपर्क वाढीवला आहे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दादासाहेब चव

गोंडा उर्फ डी. सी पाटील हे वंचित बहुजन आघाडी तर्फे निवडणूक आखाड्यात उतरले आहेत त्यांनीही जोरदारपणे प्रचारास सुरुवात केली आहे प्रत्यक्ष भेटीगाठी गावते गाव मतदारांशी संपर्क महाविकास आघाडी व महायुती यांची चुकीचे धोरणे महापुराच्या काळात तालुक्यासाठी त्यांनी केलेली मदत व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सामान्यांचा केलेला विकास संविधान वाचवण्याचे धोरण इत्यादी मुद्दे त्यांनी प्रचारात आणले आहेत जवळपास दोन प्रचार फेऱ्या शिरोळ तालुक्यास त्यांच्या पूर्ण झाले आहेत

हातकणंगले लोकसभा मतदारसंघात ही निवडणूक चौरंगी होणार हे जवळपास निश्चित झाले आहे अद्याप कोणत्याच उमेदवाराने उमेदवारी अर्ज नाही मात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी प्रचाराच्या प्रचारास जोरदारपणे सर्वच उमेदवार यांनी धुमधडाक्यात सुरुवात केली आहे तसा हा प्रचार प्राथमिक स्वरूपाचाच आहे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर खऱ्या अर्थाने प्रचारास सुरुवात होऊन कोण कोणाच्या पाठीशी राहते त्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे

विद्यमान खासदार धैर्यशील माने हे भाजपा शिवसेना युतीतून शिवसेनेचे उमेदवार म्हणून गत वेळेस निवडून आले होते मात्र त्यांनी शिवसेना फुटी नंतर शिंदे गटात प्रवेश केला होता त्यांनी अनेक जाहीर कार्यक्रमात काँग्रेस व राष्ट्रवादी नेत्यांचे जास्त कौतुक केल्याने भाजप त्यांच्यावर प्रचंड नाराज आहे तसे वेळोवेळी भाजप कार्यकर्ते प्रकट ही झाले आहेत त्यामुळे भाजपची नाराज मते धैर्यशील मानेंच्या तराजूत पडणार की अन्य ठिकाणी यावरही भवितव्य अवलंबून आहे. या निवडणुकीत कळीचा मुद्दा ठरणार आहे तो इचलकरंजी पाणी प्रश्नाचा सुळकुड योजना पूर्ण होऊन इचलकरंजीकरांना पाणी मिळावे अशी भूमिका विद्यमान खासदार धैर्यशील माने व माजी खासदार राजू शेट्टी या उभयंतांनी घेतली आहे अद्याप तो प्रश्न सुटलेला नाही शिवाय दत्तवाड सह परिसरातील अकरा गावांनी या योजनेला मोठा विरोध केला आहे यामुळे दोन्ही उमेदवारांची मोठी गोची या ठिकाणी पहावयास मिळत आहे

# पाटण तालुक्यात 'कंट्रोल युनिट' महिलांच्या ताब्यात



**राजदंड / पाटण**

लोकसभा निवडणूक प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात अडूळ येथे ९७६ मतदान कर्मचाऱ्यांना निवडणुकीबाबत प्रशिक्षणासाठी बोलावण्यात आले होते. यापैकी ९४६ कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण केले. यात ४५० महिलांचा सहभाग होता. मतदान प्रक्रियेवेळी मतदान यंत्राचे संपूर्ण नियंत्रण अर्थात 'कंट्रोल युनिट' या महिलांच्या ताब्यात असणार आहे. कौटुंबिक जबाबदारी सांभाळून सुटीच्या दिवशी देखील महिला कर्मचाऱ्यांनी उपस्थिती नोंदवून लोकसभा निवडणुकीच्या कामात त्या कुठेही मागे नसल्याचे दिसून आले.

प्रशिक्षणाच्या दोन्ही सत्रात तहसीलदार अनंत गुरव यांनी सविस्तर प्रशिक्षण दिले.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाडे यांनी त्यांचे शंका निरसन केले. मतदान यंत्र प्रात्यक्षिका दरम्यान सविस्तर प्रशिक्षण देखील दिले. मतदान यंत्र हाताळणीबाबत महिला कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सर्व प्रक्रिया समजून घेतली. महिलांची नियुक्ती पाटण मतदारसंघात त्यांच्या लगतच्या गावातच होणार असल्याने त्यांच्या मतदानयंत्र हाताळणी प्रशिक्षणावर जास्त भर या निमित्ताने देण्यात आला आहे. मतदान प्रक्रियावेळी मतदान यंत्राचे संपूर्ण नियंत्रण अर्थात कंट्रोल युनिट या महिलांच्या ताब्यात असणार आहे. त्यामुळे त्यांना मतदान यंत्राची सविस्तर माहिती व इतर माहितीसह असणे अपेक्षित असल्याचे तहसीलदार अनंत गुरव यांनी प्रशिक्षणा दरम्यान सांगितले.

## पाचगणीत घरफोडी करणारा चोरटा २४ तासाच्या आत जेरबंद

**राजदंड / पाचगणी**

पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये शाहूनगर येथे राहत्या घरात आठ मार्च रोजी अज्ञात चोरट्याने बेडरूम मध्ये प्रवेश करून आतील कपाटामधून रोख रक्कम व सोन्याचे दागिने असे एकूण ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल घोरपडी करून चोरून पसार झाला. याबाबत पाचगणी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल झाली. तक्रार दाखल झाल्यानंतर तपास सुरू झाला. यामध्ये २४ तासाच्या आत पाचगणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांनी घरपोडी करणारा आरोपी अक्षय बबन पार्टे, वय ३० राहणार विवर तालुका जावळी याला तपास करून अटक केली.

याबाबत पोलिसांनी दिलेला माहितीनुसार आठ मार्च रोजी पाचगणी शाहूनगर मध्ये घराचे कुलूप तोडून रोख रक्कम व दागिने चोरणारा आरोपी अक्षय बबन पार्टे यानेच सदर बंगला फोडून चोरी केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले यामध्ये ३६ हजार रुपयांची नऊ ग्रॅम वजनाची सोन्याची मनी मंगळसूत्र २८ हजार रुपयांचे सात ग्रॅम वजनाचे बोरमाळ तसेच काही रोग रकमेसह ६४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आरोपीकडून पोलिसांनी हस्तगत केले.

या कारवाईमध्ये पाचगणी पोलीस ठाण्याच्या सायक पोलीस निरीक्षक पवार तपासी अंमलदार श्रीकांत कांबळे पोलीस हवालदार कैलास रसाळ यांनी या तपासणी यंत्रणेमध्ये काम पाहिले.

# स्फोटक पदार्थांची विक्री करणारा रायगाव फाटा येथे जेरबंद




■ **स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**राजदंड / सातारा**

नायट्रेट सल्फर या स्फोटक पदार्थांच्या चाळीस कांड्या धोकादायक पद्धतीने वाहतूक करून त्याच्या विक्रीचा प्रयत्न करणाऱ्या एकाला रायगाव फाटा तालुका जावळी येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले त्याच्याकडून स्फोटक पदार्थांच्या चाळीस कांड्या आणि हुंडाई क्रेटा गाडी असा २१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

याबाबतची अधिक माहिती अशी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अवैध शस्त्रे आणि स्फोटक पदार्थ जवळ बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत हुंडाई क्रेटा गाडी येथून सातारा पुणे राष्ट्रीय महामार्गावर रायगाव फाटा येथे एक इसम येणार असल्याची माहिती मिळाली होती त्यानुसार सानेगुनी शाखेने तेथे सापळा रचला पोपट नाना बिचुकले वय २९ राहणार हनुमंतवाडी आदर्की खुर्द तालुका फलटण जिल्हा सातारा हा इसम गाडी चालवत होता पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याच्या गाडीत नायट्रेट सल्फर या स्फोटक पदार्थाच्या ४० कांड्या आढळून आल्या .

हुंडाई क्रेटा गाडी आणि स्फोटक पदार्थ असा २१ लाख ६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील सहायक पोलीस निरीक्षक रमेश गरजे रोहित फरणे पृथ्वीराज ताटे विश्वास शिंगाडे अमित पाटील मदन फाळके तानाजी माने यांनी कारवाईत भाग घेतला होता. या पथकाचे पोलीस अधीक्षक समीर शेख आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी अभिनंदन केले आहे.

# खिंगर येथील 'सामान्य सेवा केंद्र' जिल्हा बँकेच्या खातेदारांना सेवा देणार : राजेंद्रशेठ राजपुरे

**राजदंड / पाचगणी**

सातारा जिल्हा बँकेने दुर्गम भागातील खातेदारांना सुरळीत व तत्काळ सेवा मिळावी यासाठी सामान्य सेवा केंद्रांची निर्मिती केली आहे. या माध्यमातून महाबळेश्वर तालुक्यातील खिंगर येथील नव्याने झालेले केंद्र परिसरातील लोकांना जिल्हा बँकेचे दैनंदिन व्यवहार करण्यास सोयीचे ठरेल असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्रशेठ राजपुरे यांनी केले.



खिंगर (ता. महाबळेश्वर) येथे सीएससी सेंटरमध्ये सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बँक व्यवहार केंद्राचे उद्घाटन आज जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र शेठ राजपूरे यांचे हस्ते झाले यावेळी ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक संतोष आंब्राळे माजी सरपंच अशोक दुधाने ,युवराज दुधाने, साहेबराव आंब्राळे, संजय आंब्राळे,दिलीप दुधाने (गुरुजी), सुरेश आंब्राळे, लक्ष्मण दुधाने, विशाल दुधाने आदी मान्यवर उपस्थित होते.

या केंद्रां बद्दल माहिती देताना केंद्र संचालक बी.एस. आंब्राळे म्हणाले या केंद्राच्या माध्यमातून शेती, आरोग्य, शिक्षण, बँकिंग आणि आर्थिक सेवा इत्यादी कामे तसेच जन्माचा दाखला, पासपोर्ट, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. हे करीत असताना आता जिल्हा बँकेच्या सेवा केंद्रामधून जनधन योजना खाते उघडणे, वैयक्तिक कर्ज प्रकरणे, क्रेडिट कार्ड द्वारे पैसे काढणे, नवीन खाते उघडणे, स्वतःच्या खात्यातील व्यवहार करणे ही कामे होणार असल्याचे सांगितले.

संतोष आंब्राळे यांनी सर्वांचे स्वागत केले. अशोक दुधाने यांनी सूत्रसंचालन केले तर बी.एस. आंब्राळे यांनी आभार मानले.

## सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा :** मालगाव ता.सातारा येथे जेसीबीच्या सहाय्याने संपादीत क्षेत्रात लेव्हलींग करुन उत्खनन केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बाळकृष्ण बाबूराव पिसाळ, शंकर बाबूराव पिसाळ, प्रदीप बाळकृष्ण पिसाळ, जितेंद्र लक्ष्मण पिसाळ यांच्या विरुध्द अमर जगन्नाथ साबळे (रा. शिवथर ता. सातारा) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

ही घटना दि. २१ फेब्रुवारी पूर्वी घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. धोम डाव्या कालव्यावरील लघुपाट संपादीत क्षेत्रात ही घटना घडली आहे.

# सत्यजित पतसंस्थेकडून १५० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार

**राजदंड / कराड**



वारूंजी ता. कराड येथील सत्यजित ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्थेने सभासदांसह ठेवीदार व कर्जदार तसेच हितचिंतकांच्या विश्वासामुळे सत्यजित पतसंस्थेने चालू आर्थिक वर्षा (२०२३-२०२४) मध्ये १५० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला असल्याची माहिती सत्यजित पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन व पंचायत समितीचे माजी सदस्य नामदेव पाटील यांनी दिली.

सत्यजित पतसंस्थेस ठेवीदार, कर्जदार, सभासद, हितचिंतक यांचे आतापर्यंत सहकार्य लाभले असून भविष्यातही ते असेच मिळत राहील, अशी आशा व्यक्त करून नामदेव पाटील म्हणाले , ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेच्या ठेवी ८२ कोटी झाल्या असून संस्थेने ६५ कोटीची कर्ज वितरण केली आहेत. संस्थेचे वसूल भाग भांडवल २ कोटी ९० लाख असून संस्थेचा स्वनिधी ६ कोटी ६० लाख आहे. सत्यजित पतसंस्थेची बँकांतील गुंतवणूक २४ कोटी ७७ लाख असून संस्थेचा निव्वळ नफा १ कोटी १५ लाख आहे. ३१ मार्च २०२४ अखेर ६१५३ सभासद आहेत, अशी माहिती पाटील यांनी दिली. संस्थेने ठेवीदारांना त्यांच्या ठेवींवर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी दिली आहे. संस्थेच्या प्रगतशील वाटचालीत सर्व संचालक, सभासद, खातेदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाट असल्याचे नामदेव पाटील यांनी आवर्जून सांगितले.

# कमी मतदानाच्या केंद्रांमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांची जनजागृती!

**राजदंड / कोरेगाव**

५० टक्के पेक्षा कमी मतदान असणाऱ्या मतदान केंद्रांमध्ये स्वतः प्रशासकीय अधिकारी मतदान जागृती करणार आहेत. गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली अशा मतदान केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणार आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

कमी मतदानाच्या केंद्रांवर विशेष भर देण्यात येत असून तेथे जागृती अत्यावश्यक आहे. ५० टक्के होऊन कमी मतदान होणे हे निश्चितच भूषणावह नसून त्यामुळे एकूण मतदानाच्या टक्केवारीवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे अशा प्रकारे पथके तयार करण्यात आली आहेत. कृषी विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी ,पंचायत विस्तार अधिकारी, तलाठी, बूथ लेवल ऑफिसर या अधिकाऱ्यांची मदत घेऊन हे अभियान राबवले जाणार आहे. या अभियानातून संबंधित पथकाला नेमून दिलेल्या मतदान केंद्राच्या परिसरात जाऊन फ्लेक्स लावणे, रॅली काढणे, व्याख्यान आयोजित करणे आदी पद्धतीने मतदान जनजागृती करण्यात येत आहे.

कोरेगाव मतदारसंघाचा विचार करता यामध्ये पिरवाडी, कृष्णानगर, ललगुण, भीमनगर ,वर्धनगड ,विक्रांतनगर, सिद्धार्थनगर, विसापूर, कृष्णानगर,कोरेगाव इत्यादी मतदान केंद्रांचा अशा कमी मतदान केंद्रांमध्ये समावेश आहे. या केंद्रांची पाहणी अधिकारी करणार आहेत. तेथे काय सुविधा आहेत आणि काय आवश्यक आहेत याचा आढावा घेऊन त्याची पूर्तता करण्यात येणार आहे. शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे सूचनानुसार सदर मतदान केंद्रांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. मतदानाची कमी टक्केवारी असण्याचे कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या आदेशानुसार हा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवला जाणार आहे.

# अक्षय महाराज भोसले 'शंभू सेवा पुरस्कारा'ने सन्मानित



**दहिवडी / राजदंड**

धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराज यांच्या बलिदान दिनी धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समिती, महाराष्ट्र यांचा शंभू सेवा पुरस्काराने अक्षयमहाराज भोसले यांना महापराक्रमी महाराणा प्रताप यांचे वंशज राजे लक्ष्यराजसिंह मेवाड यांच्या शुभहस्ते लाखो शिवशंभू भक्तांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराज यांची समाधी स्थळ वढू बु.येथे हा सोहळा संपन्न झाला.

अक्षय महाराज भोसले हे शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेना पक्ष व संपूर्ण अध्यात्मिक क्षेत्र यांतील प्रमुख समन्वय राखण्याचं कार्य ते करतात. संत साहित्याच्या अभ्यासासमवेत सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. अध्यात्मिक क्षेत्रासमवेत हिंदू धर्मासाठी सेवाभाव ठेऊन समाजात सुरु असणारे प्रबोधन व गोसेवेतील प्रखरतेने सुरू असणाऱ्या विशेष कार्याप्रित्यर्थ भोसले महाराज यांना हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी अक्षय महाराज भोसले म्हणाले, धर्मवीर छत्रपती शंभूराजे यांच्या नावाचा सेवा पुरस्कार मिळणे हे आमच्या आजवर केलेल्या कार्याला त्यांचे आशीर्वाद आहेत.हा पुरस्कार मी आमच्या प्रत्येक धर्मकार्यात आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे असणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांना समर्पित करतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने तुळापूर व वढू विकासासाठी ११० कोटी ७६ लक्ष रु.निधी देत छत्रपती शिवशंभूबद्दल आपला आदर व्यक्त केला आहे.

या पुरस्कार सोहळ्या प्रसंगी प्रसिद्ध सिने अभिनेते राहुल सोलापूरकर, कृष्णकुमार गोयल,गोसेवक मिलिंद एकबोटे,विश्व हिंदू परिषदचे शंकर गायकर, स्वामी भारतानंद सरस्वती, संग्रामबापू भंडारे व मान्यवर उपस्थित होते.

# 'दरबार केसरी'वर लखन व अर्जुनची मोहर

■ **कोरेगावात गुढी पाडव्यानिमित्त बैलगाड्यांच्या शर्यती**

■ **राजा व सुंदरने पटकावला द्वितीय क्रमांक**



**राजदंड / कोरेगाव**

गुढी पाडव्याच्या निमित्ताने येथे झालेल्या बैलगाड्यांच्या शर्यतीत ''लखन'' आणि ''अर्जुन'' या बैलजोडीच्या गाडीने ''दरबार केसरी २०२४'' सह ७१ हजार रुपये रोख व एक बोकड असे बक्षीस पटकावले.

कोरेगाव - रहिमतपूर रस्त्यावर असलेल्या येथील औद्योगिक वसाहतीसमोरील मैदानात एक आदत एक बैल आणि दुसरा एक बैल अशा दोन गटांत झालेल्या या बैलगाड्यांच्या शर्यतीत एक आदत एक बैल प्रकारात २३ गट, तर एक दूसा एक बैल प्रकारात २० गट फेऱ्या झाल्या. आदतमधून चार उपांत्य फेऱ्या, तर दुसातून तीन उपांत्य फेऱ्या होऊन एकूण सात गाड्या अंतिम फेरीत पात्र ठरल्या.

अंतिम फेरीत मनोहर पाटील (संभाजीनगर)- कार्तिकराजे अक्षय घोरपडे यांच्या लखन व बापूशेठ आंबेकर - सरपंच अविनाशअण्णा मोडक (वडकी) यांच्या अर्जुन या बैलजोडीच्या गाडीने प्रथम क्रमांक मिळवला. शंभोमहादेव प्रसन्न पृथ्वीराजदादा खुटवड (फुरसुंगी) यांच्या राजा व पिंटूशेठ मोडक (वडकी) - लक्ष्मण पाटील यांच्या सुंदर उर्फ कॉकटेल या बैलजोडीच्या गाडीने द्वितीय क्रमांकाचे ४१ हजार रुपये रोख व एक बोकड बक्षीस पटकावले. टिंटु रुद्रा ग्रुप (अरबवाडी)- पप्पूशेठ म्हाते(कुंभारखानापाडा)- विकासदादा सकुंडे यांचा रूद्रा व अनया योगेश बर्गे हॉटेल महेंद्र एक्झीकेटीव्ह यांचा शिवाशेठ या बैलजोडीच्या गाडीने तृतीय क्रमांकाचे ३१ हजार रुपये रोख व एक बोकड बक्षीस पटकावले.

बडेबाबा प्रसन्न शिवांश तुषार घोरपडे (स.गड) यांच्या शिट्टी व नाशिककरांच्या एलपी शेठ या बैलजोडीच्या गाडीने चतुर्थ क्रमांकाचे २१ हजार रुपये रोख व दोन कोंबडे बक्षीस पटकावले.

श्री काळभैरवनाथ प्रसन्न गोट्या पैलवान माहुली गरूड ग्रुप करंजे यांच्या बावऱ्या व राजनंदीनी नंदूशेठ सागडे (गराडे) गोट्या पैलवान (माहुली) यांच्या बजिरंग या बैलजोडीच्या गाडीने पाचव्या क्रमांकाचे ११ हजार रुपये रोख व दोन कोंबडे बक्षीस पटकावले.

निखिलभैय्या यादव सपाटने (पंढरपूर) यांच्या चिनाशेठ व सोन्या गायकवाड (नांदगाव)- भिसे सरपंच (किरोली) यांच्या शंकर या बैलजोडीच्या गाडीने सहाव्या क्रमांकाचे नऊ हजार व दोन कोंबडे बक्षीस पटकावले. स्वप्नीलराजे दीपकशेठ साखरे (मुरूम) यांच्या सुंदर व नंदूशेठ सागरे (गराडे) गोट्या पैलवान (माहुली) यांच्या लारा या बैलजोडीच्या गाडीने सातव्या क्रमांकाचे सात हजार रुपये व दोन कोंबड्या बक्षीस पटकावले.

# सह्याद्रीने हंगाम आव्हानात्मकरित्या पेलला - आ. बाळासाहेब पाटील

**पुढील हंगामात विस्तारवाढ यंत्रणा कार्यान्वित**

**राजदंड / मसूर**

सह्याद्रीचा गळीत हंगाम आव्हानात्मक होता. तो लिलया पेलला. सभासदांच्या मागणीनुसार येणाऱ्या गळीत हंगामात विस्तारवाढ यंत्रणा कार्यान्वित होईल. सह्याद्रीकडे २२ हजार ६१ हेक्टर उसाची नोंद झाली होती. त्यात ८ हजार ६०४.२७ हेक्टर गळीत झाल्याचे व ११ लाख ९७ हजार क्विंटल साखरेचे उत्पन्न झाले आहे, अशी माहिती माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व आमदार बाळासाहेब पाटील यांनी कारखान्याच्या गळीत हंगामाच्या समारोप प्रसंगी बोलताना दिली.

आ. पाटील म्हणाले काही भौगोलिक व राजकीय कारणाने १३ हजार हेक्टर ऊस अन्यत्र गेला. आपल्यासमोर खाजगी कारखानदारीचे मोठे आव्हान आहे. सहकार अडचणीत आला तर खाजगी कारखानदार जे लादतील ते नियम मान्य करावे लागतील. सहकार टिकला तरच शेतकरी भविष्यात वाचणार आहे. ३ नोव्हेंबर पासून १४७ दिवस चाललेल्या हंगामात १० लाख ५ हजार ६१०मे. टन उसाचे गळीत झाले. साखर उतारा १२.२२ आला. तर ११ लाख ९७ हजार क्विंटल साखरेचे उत्पन्न झाले आहे. अजूनही काही साखर प्रोसेसमध्ये असून त्यात वाढ होईल. गतवर्षी हेक्टरी उत्पन्न १०६ होते. यावर्षी दुष्काळी परिस्थितीत ते ११२ टनावर गेले. हेक्टरी उत्पन्नात ६ टनाची वाढ झाली. सभासदांच्या मागणीनुसार येणाऱ्या गळीत हंगामात विस्तारवाढ यंत्रणा कार्यान्वित होईल. जिरायत शेती बागायती व्हावी हा स्व पी. डी. पाटील यांच्या दूरदृष्टीतून कृष्णा काठावर साकारलेल्या लिफ्ट इरिगेशन व आरफळचे पाणी शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न राहिला. त्या अनुषंगाने उसाच्या उत्पन्नात वाढ झाली.

यावेळी ऊसतोड व वाहतुकीत विशेष कामगिरी करणाऱ्या कामगारांचा सत्कार आ. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी प्रास्ताविक केले. व्ही बी चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. मानसिंगराव जगदाळे यांनी आभार मानले.

**आम्ही फक्त विश्वस्त...**

**आमदार पाटील म्हणाले सह्याद्री कारखाना सभासदांचा आहे. आम्ही फक्त विश्वस्त आहे. दोघांच्या विश्वासाने सहकार वाढवायचा आहे. येणाऱ्या हंगामात विस्तारवाढ सुरू होत आहे. सर्व सभासदांचा ऊस वेळेत जाईल याची काळजी प्रशासन घेईल.**




**यशवंतनगर, ता. कराड येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या ५०व्या गळीत हंगामाची सांगता कारखान्याचे संचालक रामचंद्र पाटील व सौ सरिता पाटील यांच्या हस्ते झाली. व्हा. चेअरमन लक्ष्मीताई गायकवाड, संचालक मानसिंगराव जगदाळे, जशराज पाटील, माणिकराव पाटील, लालासाहेब पाटील, माजी सभापती कांतीलाल पाटील, तांबवेच्या सरपंच शोभाताई शिंदे, सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी व शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**राजकीय लाभ उठवणाऱ्याना आरफळ कालवा कुठून सुरू होतो. त्याची मंजुरी केव्हा मिळाली. यंत्रणा कुठे कार्यान्वित होणार आहेत, फॉरेस्टची व प्रशासकीय अडचण काय आहे? यातील काहीच माहिती नाही. ही मंडळी राजकीय सत्तेत असल्याने लाभ उठवण्याचा प्रयत्नात आहेत. मात्र याची चिंता नाही. तिकडे लक्ष देऊ नका, असे आ. बाळासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.**

### विशाखापट्टणम् येथील हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड येथे

## भारतीय नौदलासाठीच्या पहिल्या फ्लीट सपोर्ट जहाजाचा स्टील कटिंग सोहळा संपन्न

**नवी दिल्ली :** संरक्षण सचिव गिरीधर अरमाने यांच्या उपस्थितीत आज, १० एप्रिल २०२४ रोजी विशाखापट्टणम् येथील हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड येथे (एचएसएल) भारतीय नौदलासाठीच्या पाच फ्लीट सपोर्ट जहाजांच्या तुकडीतील पहिल्या जहाजाचा स्टील कटिंग सोहळा संपन्न झाला. इस्टर्न नेव्हल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ व्हॉईस ॲडमिरल राजेश पेडणेकर, एचएसएलचे अध्यक्ष तसेच व्यवस्थापकीय संचालक सीएमडीई हेमंत खत्री(निवृत्त) यांच्यासह भारतीय नौदल आणि एचएसएलमधील अनेक वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पाच फ्लीट सपोर्ट जहाजांच्या तुकडीच्या संपादनासाठी ऑगस्ट २०२३ मध्ये एचएसएल कंपनीशी करार करण्यात आला होता आणि ही जहाजे २०२७च्या मध्यापर्यत भारतीय नौदलाकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. भारतीय नौदलात रुजू झाल्यानंतर ही फ्लीट सपोर्ट जहाजे समुद्रातील जहाजांच्या मदतीच्या माध्यमातून भारतीय नौदलाच्या सागरी क्षमतेत मोठी भर घालतील. सुमारे ४०,००० टनांहून अधिक विस्थापन क्षमता असलेली ही जहाजे समुद्रात कार्यरत जहाजांसाठी इंधन, पाणी, शस्त्रास्त्रे तसेच इतर साठा वाहून नेऊन त्याचा पुरवठा करतील जेणेकरून त्या जहाजांना या बाबींसाठी बंदराकडे परत यावे न लागता अधिक दीर्घकाळ सागरी कारवाया सुरु ठेवता येतील. यामुळे नौदलाच्या जहाजांची धोरणात्मक पोहोच आणि गतिशीलता यात अधिक सुधारणा होईल. दुय्यम भूमिका सांभाळताना ही जहाजे, मानवतावादी मदत तसेच आपत्ती निवारण कार्यासाठी आपत्कालीन परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांची सुटका करण्यासाठी तसेच नैसर्गिक संकटांच्या काळात सागरातील जहाजांना मदत साहित्याचे त्वरित वितरण करण्यासाठी सज्ज ठेवता येतील.

संपूर्णत: स्वदेशी संरचना तसेच जहाजबांधणीसाठी आवश्यक बहुतांश उपकरणांचा स्वदेशी उत्पादकांकडून पुरवठा यामुळे हा जहाज बांधणी प्रकल्प भारतीय जहाजबांधणी उद्योग क्षेत्राला नवी चालना देईल. या प्रकल्पाची संकल्पना केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया आणि मेक फॉर द वर्ल्ड या उपक्रमांना अनुसरून आहे.

## केंद्रीय खाण मंत्रालयातर्फे खाणकाम क्षेत्रातील स्टार्ट अप उद्योगांसाठी वेबिनारचे आयोजन



**नवी दिल्ली :** खाणकाम आणि खनिज प्रक्रिया क्षेत्रात संशोधन तसेच नवोन्मेषाला चालना देण्याचे नवनवीन मार्ग शोधण्याच्या उद्देशाने केंद्रीय खाण मंत्रालयाने खाणकाम आणि धातुशास्त्र क्षेत्रात कार्यरत स्टार्ट अप उद्योग, एमएसएमई तसेच संशोधकांसाठी आज नवी दिल्ली येथे विशेष वेबिनारचे आयोजन केले. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग सचिव प्रा.अभय करंदीकर यांनी या वेबिनारचे उद्घाटन केले तर केंद्रीय खाण विभागाचे सचिव व्ही.एल.कांताराव यांचे या प्रसंगी बीजभाषण झाले.

केंद्रीय खाण मंत्रालयाने नोव्हेंबर २०२३ मध्ये ''खाणकाम, खनिज प्रक्रिया, धातुशास्त्र तसेच पुनर्वापर क्षेत्रात कार्यरत स्टार्ट अप उद्योग तसेच एमएसएमई उद्योगांमधील संशोधन आणि नवोन्मेषाला चालना (एसअँडटी-पीआरआयएसएम)'' हा उपक्रम सुरु केला. खनिज क्षेत्र, खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी अप्लाईड तसेच शाश्वत दृष्टीकोन अशा क्षेत्रांमध्ये कार्यरत स्टार्ट अप्स तसेच एमएसएमई उद्योगांना संशोधन आणि नवोन्मेष करण्यासाठी निधी पुरवण्याच्या हेतूने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. हा उपक्रम संशोधन आणि विकास कार्य आणि व्यावसायिकीकरण यांच्यातील दरी भरून काढेल तसेच खाणकाम आणि खनिज क्षेत्रातील संपूर्ण मूल्यसाखळीसाठी परिसंस्था उभारण्यास देखील प्रोत्साहन देईल.

एसअँडटी-पीआरआयएसएम या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय खाण मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली नागपूर येथील जवाहरलाल नेहरु अल्युमिनियम संशोधन विकास आणि संरचना केंद्र (जेएनएआरडीडीसी) या स्वायत्त संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.

जेएनएआरडीडीसीने एसअँडटी-पीआरआयएसएम या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नवीन प्रस्ताव मागवले असून हे प्रस्ताव सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२४ पर्यतची कालमर्यादा देण्यात आली आहे. ईशान्य प्रदेशातील स्टार्ट अप उद्योग आणि एमएसएमईज तसेच महिलांनी चालवलेल्या उद्योगांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या वेबिनारमध्ये स्टार्ट अप उद्योग, या क्षेत्रातील तज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्यासह २०० हून अधिक लोकांनी भाग घेतला. या वेबिनारदरम्यान, उपस्थित प्रतिनिधींनी खाणकाम आणि खनिज प्रक्रिया क्षेत्रातील नवीनतम पद्धती, आव्हाने आणि संधी यांच्या संदर्भातील वैचारिक चर्चामध्ये भाग घेतला.

## डाळींचा साप्ताहिक साठा उघड करण्याची अंमलबजावणी करण्याचे केंद्राचे राज्ये केंद्रशासित प्रदेशांना निर्देश



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने बुधवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सर्व साठा करणाऱ्या संस्थांद्वारे डाळींचा साप्ताहिक साठा उघड करण्याची अंमलबजावणी करण्याचे आणि त्यांनी घोषित केलेल्या साठ्याची पडताळणी करण्याचे निर्देश दिले. प्रमुख बंदरे आणि कडधान्य उद्योग केंद्रांमध्ये असलेल्या गोदामांमधला साठा वेळोवेळी पडताळला जावा आणि साठा करणाऱ्या संस्था साठा प्रकटन पोर्टलवर चुकीची माहिती देत असल्याचे आढळून आल्यावर कठोर कारवाई केली जावी असेही या निर्देशात म्हटले आहे.

ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी साठा करणाऱ्या संस्थांद्वारे डाळींचा साठा उघड करण्याची अंमलबजावणी करण्याच्या ५ एप्रिल २०२४ रोजी सर्व राज्ये केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आलेल्या निर्देशाचा पाठपुरावा म्हणून राज्य ग्राहक व्यवहार, अन्न आणि नागरी पुरवठा विभागांचे प्रधान सचिव आणि सचिवांसह बैठक घेतली. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना साठेबाजी आणि बाजारातील हेराफेरी रोखण्यासाठी डाळींच्या संदर्भात साठा स्थिती आणि किमतीच्या कलाबाबत वाढीव सतर्कतेची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.

आयात आणि साठा प्रकटनाशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी त्यांनी डाळी आयातदार संघटना आणि इतर कडधान्य उद्योग प्रतिनिधींसोबत बैठक घेतली.

सहभागींनी कडधान्य उद्योग आणि विशेषत: आयातीबद्दल त्यांचे विचार आणि माहिती सामायिक केली. आयातदार आणि उद्योजकांनी साप्ताहिक आधारावर आयात केलेल्या पिवळ्या वाटाणासहित त्यांच्या डाळींचा साठा प्रामाणिकपणे घोषित करण्यास सांगितले आहे. या संदर्भात, ग्राहक व्यवहार विभागाने पिवळा वाटाणा आणि मोठी साखळी असणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांचा समावेश करण्यासाठी साठा प्रकटन पोर्टल https://fcainfoweb.nic.in/psp/ मध्ये सुधारणा केली आहे जी १५ एप्रिल २०२४ पासून कार्यान्वित होईल.

तूर, उडीद, चणा, मसूर आणि मूग या पाच प्रमुख डाळींव्यतिरिक्त, आयात केलेल्या पिवळ्या वाटाण्याच्या साठ्याचे निरीक्षण करण्यास राज्येकेंद्रशासित प्रदेशांना सांगण्यात आले आहे. डाळींची एकूण उपलब्धता वाढवण्यासाठी ८ डिसेंबर २०२३ पासून ३० जून २०२४ पर्यत पिवळ्या वाटाण्याच्या आयातीला परवानगी देण्यात आली आहे. आयात केलेले पिवळे वाटाणे बाजारात नियमितपणे येत राहतील याची खात्री करण्याची गरज खरे यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे तूर, उडीद आणि मसूर यांचा आयातदारांकडे असलेला साठा बाजारात सुरळीत व नियमित येण्यासाठी निरीक्षण केले जाणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर निशाणा

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नागपूरच्या कन्हानमध्ये जाहीर सभा पार पडली. ही सभा नागपूर आणि भंडारा-गोंदिया या तीन लोकसभा मतदारसंघासाठी एकत्रित होती. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. 'इंडिया आघाडीला त्यांच्या पापाची शिक्षा मिळाली पाहिजे', असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला.

पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

''१९ एप्रिलला आपल्याला एक खासदार निवडायचा नाही, तर येणाऱ्या एक हजार वर्षासाठी भारताला मजबूत करण्यासाठी मतदान करायचे आहे. विकसित भारताच्या संकल्पनेसाठी मतदान करायचे आहे. सध्या मीडियावाले एक सर्व्हे दाखवत आहेत. या सर्व्हेत 'एनडीए'चा मोठा विजय दिसत आहे. पण मी आज त्यांची मदत करणार आहे. मीडियावाले सर्व्हेमध्ये एवढा खर्च का करत आहेत. मी त्यांना सल्ला देतो की, ज्यावेळी मोदींना शिव्या पडतात, ज्यावेळी मोदींवर विरोधक टीका करतात तेव्हा समजून जायचे की पुन्हा एकदा मोदी सरकार'', असा खोचक टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना लगावला.



''आजकाल इंडिया आघाडीवाले सध्या एक खोटी माहिती पसरवण्याचे काम करत आहेत. जर पुन्हा मोदी पंतप्रधान झाले तर संविधान धोक्यात येईल, असा खोटा प्रचार ते करत आहेत. मग आणीबाणीच्या काळात देश धोक्यात नव्हता का? उत्तर ते दक्षिणपर्यत एक प्रकारे चारही बांजूनी त्यांनी कब्जा केला होता. त्यावेळी संविधान धोक्यात नव्हते का? आता एक गरीबाचा मुलगा पंतप्रधान झाला तर इंडिया आघाडीला देशाचे संविधान धोक्यात दिसते. मराठीत एक म्हण आहे, पाण्यावर कितीही लाठी मारली तरी पाणी दुंभगत नाही. तसेच गरीबाच्या या मुलावर कितीही हल्लाबोल केला तरी नरेंद्र मोदी या देशातील जनतेच्या सेवेतून मागे हटणार नाही'', अशा शब्दात पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना सुनावले. ''मी देशाच्या नागरिकांना आवाहन करतो की, देशाच्या नावावर मतदान द्या. हे इंडिया आघाडीवाले ताकदवान झाले तर देशाचे तुकडे तुकडे करतील. इंडिया आघाडीला महाराष्ट्रात एकही जागा देऊ नका. दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे काम विरोधक करत आहेत. मात्र, इंडिया आघाडीला त्यांच्या पापाची शिक्षा झाली पाहिजे'', असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला.

## ईद-उल-फित्रच्या पूर्वसंध्येला उपराष्ट्रपतींकडून देशवासियांना शुभेच्छा

**नवी दिल्ली :** ईद-उल-फित्रच्या शुभ प्रसंगी सर्व नागरिकांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

रमझानच्या पवित्र महिन्याच्या समाप्ती निमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या ईद-उल-फित्र ला कृतज्ञता आणि एकजुटीच्या भावनेचे प्रतीक म्हणून खूप महत्व आहे. या सणाच्या केंद्रस्थानी असलेल्या करुणा, औदार्य आणि एकतेच्या मूल्यांची आठवण तो करून देतो आणि आपल्या वैविध्यपूर्ण राष्ट्राची लोकभावना प्रतिध्वनित होते.

ही ईद सर्वांच्या आयुष्यात आनंद, परिपूर्णता आणि भरभरून सद्भावना घेऊन येवो.

उपराष्ट्रपतींच्या संदेशाचा हिंदी अनुवाद खालीलप्रमाणे आहे:

ईद-उल-फितर के पावन पर्व पर सभी देशवासियों को हार्दिक बधाई और शुभकामनाएं देता हूं।

पवित्र माह रमज़ान की समाप्ति पर मनाए जाने वाली ईद-उल-फितर का सांस्कृतिक रूप से विशेष महत्व है। कृतज्ञता और भाईचारे की भावना के प्रतीक इस त्योहार के केंद्र में करुणा, उदारता और एकता के मूल्य स्थापित हैं जो हमारे विविधतापूर्ण राष्ट्र की मूल भावना को परिलक्षित करते हैं।

मेरी कामना है कि ईद का यह पावन अवसर सभी के जीवन में हर्षोल्लास, परिपूर्णता और शुभाशीष लेकर आए।

### बारामतीच्या विजयात सिंहाचा वाटा पुरंदरचा असेल; विजय शिवतारेंचा अजित पवारांना शब्द

**बारामती :** गोष्टी घडत असतात, विसरायच्या असतात, मतभेद झाले हरकत नाही, मनभेद नको. गावागावात ८०-९० टक्के मतदान सुनेत्रा पवारांच्या घड्याळ चिन्हावर झालं पाहिजे. मोदींना झालं पाहिजे. बारामतीच्या विजयात सिंहाचा वाटा पुरंदरचा असेल. पुरंदरची जनता मोठ्या प्रमाणात लीड सुनेत्रा पवारांना देतील हा शब्दविजय शिवतारेंनी सासवडच्या महायुतीच्या मेळाव्यात दिला.

विजय शिवतारे म्हणाले की, बारामतीपेक्षा जास्त लीड पुरंदरमधून मिळालं पाहिजे. बारामतीत समसमान मते होतील, पण पुरंदरमध्ये बारामतीपेक्षा जास्त लीड आम्ही देऊ असं त्यांनी सांगितले.

# आमचे सरकार आल्यावर एका झटक्यात गरिबी हटवणार'

## राहुल गांधींचा मोठा दावा...



**राजदंड न्युज नेटवर्क :** आगामी लोकसभा निवडणुकीत विजयी होण्यासाठी राजकीय पक्षांकडून विविध आश्वासने दिली जातात. अशातच,काँग्रेसखासदारराहुल गांधीयांनी देशातील नागरिकांना एक मोठे आश्वासन दिले. गुरुवारी (११ एप्रिल, २०२४) ईद-उल-फित्रच्या निमित्ताने, राहुल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर एका पोस्टमधून सरकारवर निशाणा साधला.

या पोस्टमध्ये राहुल गांधींनीपीठ, डाळ, दूध, तेल, पेट्रोल, गॅस, डॉलरच्या जुन्या(काँग्रेससरकारच्या काळातील) आणि आताच्या(मोदी सरकारच्या काळातील) किमती लिहिल्या. तसेच, काँग्रेसचे सरकार आल्यावर गरीब कुटुंबातील महिलांना दरवर्षी एक लाख रुपये देण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले..'महागाईत आणि बेरोजगारी, यामुळे सर्वसामान्यांना दुहेरी फटका बसतोय. हेच आज देशासमोरचे दोन मोठे प्रश्न आहेत. प्रसारमाध्यमे हे लपवण्याचा प्रयत्न करताहेत. 'मोदी की बात' दाखवून महत्वाचा मुद्दा लपवला जातोय. भाजप सरकारचे सत्य जनतेसमोर येऊ नये म्हणून हे केले जात आहे. नरेंद्र मोदी आपले 'रिपोर्ट कार्ड' देशापासून लपवत आहेत. आम्ही गरीब कुटुंबातील महिलांना वर्षाला एक लाख रुपये, म्हणजेच दरमहा साडेआठ हजार रुपये देऊन गरिबीच्या दलदलीतून बाहेर काढू. ही काँग्रेसची हमी आहे', असे राहुल यांनी या पोस्टमध्ये म्हटले.एका झटक्यात गरिबी हटवू.

राहुल गांधींनी या पोस्टसोबतच ५६ सेकंदांची व्हिडिओ क्लिपही शेअर केली, ज्यामध्ये ते राजस्थानच्या बिकानेरमध्ये एका जाहीर सभेत बोलताना दिसतात. 'देशातील सर्वात मोठा मुद्दा कोणता? ९० टक्के लोक म्हणतील बेरोजगारी आणि महागाई. काँग्रेसचे सरकार आल्यानंतर, तुम्ही दारिद्र्यरेषेखाली असाल, तर तुमच्या बँक खात्यात दरवर्षी एक लाख रुपये (दरमहा आठ हजार पाचशे रुपये) येत राहतील आणि एका झटक्याने भारतातून गरिबी हटवू,' असा दावा त्यांनी

# मोदींनी नजर फिरवली तर फेसबुक लाईव्ह करणाऱ्याच्या तोंडातून फेस येईल; एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर जहरी टीका

**रामटेक :** राज्यातील काही नेते फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आरोप करतात. पण नरेंद्र मोदी अशा नेत्यांकडे लक्ष देत नाहीत. मोदींनी त्यांच्याकडे नजर फिरवली तर फेसबुक लाईव्ह करणाऱ्यांच्या तोंडाला फेस येईल, अशी खोचक टिप्पणी करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ते बुधवारी रामटेकमध्ये महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला.

देशात सध्या तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. मात्र, या उष्ण तापमानातही रामटेकमध्ये नरेंद्र मोदी यांना ऐकण्यासाठी लाखो लोक आले आहेत. संपूर्ण देशात मोदीनामाचा घोष सुरु आहे. त्यामुळे देशात उष्णतेच्या लाटेप्रमाणेच मोदी लाटही आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले. पंतप्रधान मोदी रामाच्या आशीर्वादाने देशात विकसित सुराज्य निर्माण करत आहेत. सत्तेसाठी आसुसलेले विरोधक मोदीद्वेषाने पछाडलेले आहेत. ज्यांचे आयुष्य भ्रष्टाचार, घोटाळे आणि पैसे मोजण्यात गेले त्यांना मोदींवर आरोप करण्याचा नैतिक अधिकार नाही. अशा नेत्यांची अवस्था 'अंगात नाही बळ आणि चिमटा काढून पळ', अशी आहे. पण मोदी विरोधकांच्या आरोपांकडे बिलकूल लक्ष देत नाहीत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

विरोधक मोदींवर जितकी टीका करतील, तेवढाच आमचा फायदा होईल. २०१४ आणि २०१९ मध्ये विरोधकांनी मोदींवर आरोप केले होते. आतादेखील विरोधक मोदींवर तुटून पडले आहेत. पण या लोकसभा निवडणुकीत मोदी सर्व रेकॉर्ड म ोडीत काढत विजयी होतील. आत्मविश्वास विजयाकडे नेतो, तर अहंकार विनाशाकडे घेऊन जातो. मोदी आत्मविश्वासाने परिपूर्ण आहेत, असा दावा एकनाथ शिंदे यांनी केला.

विदर्भातील सर्व जागा मोदींच्या पदरात टाकू: नितीन गडकरी

या सभेत भाजपचे केंद्रीय मंत्री आणि नागपूर लोकसभेचे उमेदवार नितीन गडकरी यांनीही भाषण केले. त्यांनी विदर्भात भाजपला मोठा विजय मिळेल, असे भाकीत केले. जेव्हा एखाद्याविरोधात काही बोलायला काही शिल्लक नसेल, लोकांना आपल्या बाजूने वळवता येत नसेल तेव्हा लोकांना कन्फ्यूज केले जाते. विरोधकाही आता देशात मोदी सरकार पुन्हा आल्यास देशाचे संविधान बदलण्यात येईल, असे सांगून लोकांना संभ्रमात टाकत आहेत. मुस्लीम आणि दलितांना भीती दाखवून मते मागत आहेत. मात्र, तुम्ही कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नका. तुम्हा सर्वांचे भविष्य या निवडणुकीशी जोडलेले आहे. मी मोदींना आश्वासन देतो की, विदर्भातील १०० टक्के जागा एनडीएला मिळतील. मोदींच्या बहुमतात विदर्भाचा मोठा वाटा असेल, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

## अमेठीत उमेदवार जाहीर करण्यास काँग्रेस का करतेय उशीर?

**राजदंड न्युज नेटवर्क :** लोकसभा निवडणुकीच्या तयारीत सर्वच राजकीय पक्ष आपापल्या विरोधी पक्षांना लक्ष्य करत आहेत. याच दरम्यान, अमेठीच्या विद्यमान खासदार आणि केंद्रीय मंत्रीस्मृती इराणीयांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. तुम्ही या भागातीलकाँग्रेसचेराजकारण पाहिलं आहे. तुम्ही सर्वांनी गंभीर परिस्थितीत काँग्रेस गायब होताना पाहिली आहे. कोरोना व्हायरस आला तेव्हा काँग्रेस पक्षातील कोणीही लोकांमध्ये दिसलं नाही असंस्मृती इराणीयांनी म्हटलं.

अमेठीतील काँग्रेस उमेदवाराच्या घोषणेला होत असलेल्या विलंबाबाबत केंद्रीय मंत्री स्मृती इराणी म्हणाल्या की, यावरून आता काँग्रेस पक्षालाही कळलं आहे की अमेठीने पुन्हा एकदा कमळ फुलवण्याचा निर्णय घेतला आहे. यामागचे कारण म्हणजे जर आपण काँग्रेस पक्षाची ५० वर्षे आणिराहुल गांधींची१५ वर्षे विरुद्ध भाजपा खासदाराची पाच वर्षे पाहा म्हणजे जमीन आसमानाचा फरक दिसेल.जेव्हा देशासमोर कोरोनाचं आव्हान होतं, तेव्हा गांधी घराण्यातील एकही व्यक्ती अमेठीत दिसली नाही. तुमची खासदार गावोगावी



गेली हे कोणीही खोटं ठरवू शकत नाही. कोरोनाच्या काळात मी गावोगावी फिरत होते. मी येथे जातीच्या आधारावर नाही तर अमेठीची एक कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून तुमचं समर्थन मागत आहे.अमेठीच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे ६ हजार रुपये मागितले नाहीत,

मात्र पंतप्रधान मोदींनी ही रक्कम वाढवली. आज अमेठी लोकसभा मतदारसंघात ४ लाख २० हजार कुटुंबांना वर्षाला ६ हजार रुपये मिळतात. काँग्रेसची ५० वर्षे हुकुमशाही होती. अमेठीत वर्षभरात ते गरिबांसाठी शौचालयही बांधू शकले नाहीत. त्यांना (राहुल गांधी) शिंका आली तरी ते परदेशातील रुग्णालयात जायचे पण अमेठीत मेडिकल कॉलेजही बांधलं नाही असं देखील स्मृती इराणी यांनी म्हटलं आहे.